SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..





रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १०.०९.२०२५ | अंक नं. १३७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना.. तेवढी टक्के मजुरीत सूट..
उत्सव मजुरीचा
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*



अरिहंत टूर्स अँड ट्रॅव्हल्स आयोजित
वैष्णोदेवी यात्रा
अमृतसर | शिवखोडी | पटनीटॉप सह
प्रवासाची तारीख : १५ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२५
फक्त ₹१३,९९९/- प्रति व्यक्ती



✨ आमच्यासोबत प्रवास म्हणजे – आराम, सुरक्षितता आणि आनंदाची हमी! ✨
देशांतर्गत असो वा आंतरराष्ट्रीय... सर्व टूर अरिहंत टूर्स अँड ट्रॅव्हल्स देतो सर्वात बेस्ट प्राईज आणि उत्तम सेवेसह!
बुकिंगसाठी संपर्क करा
9145485858 | 9130875858 | 8306111158
ऑफिस पत्ता:- अरिहंत टूर्स अँड ट्रॅव्हल्स, ओला शोरूम जवळ, नगर पुणे रोड, माणिक नगर, अहिल्यानगर, महाराष्ट्र.


# शहरासह उपनगरात स्वच्छतेचा उडाला बोजवारा, सर्वत्र साचलेत कचऱ्याचे ढीग

## महापालिका प्रशासनाकडून नगरकरांच्या आरोग्याशी खेळ; नागरिकांमधून व्यक्त होतोयं तीव्र संताप

नगर – शहरासह उपनगरात गेल्या काही दिवसांपासून स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे दिसून येत आहे. उपनगर भागातील नागरी वसाहतींमध्ये आठवड्यातून एकदाच झाडलोट होत आहे. घंटागाडीही नियमित येत नसल्याने आणि कचरा उचलला जात नसल्याने रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला कचरा साचल्याचे चित्र आहे. ही सर्व परिस्थिती पाहता महापालिका प्रशासन नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

नुकत्याच गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी जिल्हा प्रशासन, पोलिस, महापालिका यांची आढावा बैठक घेत विविध विभागांना त्यांनी गणेशोत्सव काळात करावयाची कामे आणि घ्यावयाची दक्षता याबाबत आदेश दिले होते. मिरवणुकीच्या मार्गावरील खड्डे तातडीने दुरुस्त करावेत. महानगरपालिका क्षेत्रातील कचरा प्रश्न सोडवण्यासाठी अधिक मनुष्यबळ आणि वाहने उपलब्ध करून द्यावीत. शहरातील रस्त्यांवरून मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. असे आदेश महापालिकेला दिले होते. मात्र या आदेशाला महापालिका प्रशासनाकडून केराची टोपली दाखविली गेल्याचे चित्र ऐन गणेशोत्सवात दिसून आले. आता गणेशोत्सव संपल्यावरही हे चित्र कायम आहे.




रस्त्यांवर साचलेले कचऱ्याचे ढिग. (छाया – धनेश कटारिया)

### उपनगरी भागातील नागरिक झाले त्रस्त

सावेडी, बोल्हेगाव, नागापूर, केडगाव, मुकुंदनगर, कल्याण रोड अशा भागात उपनगरे विकसित झाली आहेत. या भागात दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत आहे. मध्य शहरापेक्षा अधिक लोकसंख्या या उपनगरांमध्ये आहे. मात्र, तुलनेने या भागांमध्ये दैनंदिन स्वच्छता व साफसफाईसाठी कामगार उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या भागातील नागरी

(पुढील मजकूर पान २ वर)

# अहिल्यानगर महानगरपालिका शहरात चार 'आपले सरकार केंद्र' सुरू करणार

## चारही प्रभाग समिती कार्यालयाच्या हद्दीतून नागरिकांना सेवा उपलब्ध होणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती

नगर – महानगरपालिकेने राज्य शासनाच्या निर्देशानुसार शहरामध्ये चार आदर्श आपले सरकार केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी इच्छुकांकडून प्रस्ताव मागवण्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. लवकरच प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया पूर्ण होऊन चारही केंद्रे नगरकरांच्या सुविधेसाठी कार्यरत होतील, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.




यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत विविध विभागांच्या कामांचा, प्रलंबित योजना, प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. मागील बैठकीमध्ये चार प्रभाग समिती कार्यालयाच्या हद्दीत चार आपले सरकार केंद्र सुरू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचा आढावा घेतांना सदर केंद्रांसाठी निविदा प्रक्रिया करून प्रस्ताव मागवण्यात आल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. लवकरात लवकर ही केंद्र सुरु करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिले.

तसेच, शहरातील प्रलंबित रस्त्यांच्या कामांना गती देणे, मोकाट कुत्री व मोकाट जनावरांवर कारवाईबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, जन्म व मृत्यू नोंदणी विभागाच्या कामात सुसूत्रता आणावी, तेथील अनावश्यक रॅक, साहित्य काढावे, कार्यालयाच्या परिसरात स्वच्छता ठेवावी, अशा सूचना यशवंत डांगे यांनी दिल्या.

अहिल्यानगर शहरातील पथविक्रेते, फेरीवाल्यांकडून रस्ता बाजू शुल्काची आकारणी केली जाते. त्यासाठी निविदा मागवण्यात आल्या असून पुढील आठवड्यापासून वसुली सुरु करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.


सुयश कॉर्नर
ड्रायफ्रूटस् अँण्ड किराणा
फ्री होम डिलिव्हरी
Whats App 9822067373
ब्रँच १ : तेलीखुंट 9822067373
ब्रँच २ : सावेडी प्रोफेसर चौक 9011696696




कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
Contact : 8767369367
प्रोप्रा : आशिष चंद्रकांत मुथ्था (वांबोरीकर)



महासेल...ऑफर
शनिवार दि.१३ व रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी फक्त दोनच दिवस ऑफर उपलब्ध
यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-
✲ लहान मुलांसाठी :- शर्ट+जिन्सपॅन्ट, हुडी+पॅन्ट, स्वेट शर्ट, ३ टि-शर्ट, ४ उलण फुलपॅन्ट, स्कुलबॅग अजुनही बरेच काही..
✲ महिलांसाठी :- टु पिस, थ्रि पिस, वन पिस,नाईट ड्रेस, कॉड सेट, साडी, वर्क केलेले ब्लाऊज, फॉरमल पॅन्ट, ट्राऊजर अजुनही बरेच काही..
✲ पुरुषांसाठी :- जेन्ट शर्ट, नाईट पॅन्ट टि-शर्ट, ट्राऊजर, फॉरमल पॅन्ट
Terms & Conditions Apply.
सर्वांसाठी स्वेटर्स व जर्किन्स् मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८




माननीय सी.पी. राधाकृष्णन यांची भारताचे नवे उपराष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन!

मा. श्री. अविनाश देडगांवकर समाजसेवक, अहिल्यानगर



पुरुषांसाठी ब्रॅण्डेड प्रिमीयम क्वालिटी जिन्स व फॉर्मल पॅन्टस्


(साईज 28 ते 40 पर्यंत) Rs.300/- पासून Rs.800/- पर्यंत
(साईज 28 ते 40 पर्यंत) Rs.300/- पासून Rs.500/- पर्यंत
Terms & Conditions Apply.
ब्रॅंडेड शर्ट साईज M पासून 7XL पर्यंत Rs.200/- पासून Rs.500/- पर्यंत मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



॥ पाचवे पुण्यस्मरण ॥

स्व.अनिता अशोक काबरा
स्व.दि.११/०९/२०२०
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
आपल्या पवित्र स्मृतिस भावपुर्ण श्रध्दांजली
शोकाकुल
समस्त काबरा परिवार
सागर एजन्सी
स्वस्तिक मार्ट, अ.नगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## महापालिकेत सावेडी गावठाण वर्ग झालेले नसल्याने प्रारुप प्रभाग रचनेतून वगळावे

नगर - आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने नुकतीच महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण नगर शहराची नवीन वॉर्डरचना करण्यात आली. त्यामध्ये सावेडी गाव व सावेडी गावठाणची देखील प्रभाग रचना करण्यात आली. परंतु सावेडी गावठाण हे महानगरपालिकेत व तत्कालीन नगरपालिकेत वर्गच झालेले नाही. याबाबत २०१८ च्या प्रभाग रचनेवेळी देखील हरकत नोंदविली होती. त्याची सुनावणी तत्कालीन जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त यांच्यासमोर होऊन देखील त्यांनी याची योग्य ती दखल न घेतल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याबाबत याचिका दाखल केली होती. परंतु मध्यंतरी कोव्हिड व इतर कारणामुळे ती याचिका अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. सावेडी ग्रामपंचायत १९६२ साली बरखास्त करुन तत्कालीन अ.नगर नगरपरिषेदत महाराष्ट्र शासनाच्या आदेशाद्वारे वर्ग करण्यात आले. त्यानंतर १९९९ मध्ये शहर विस्ताराच्या अनुषंगाने तत्कालिन नगरपालिकेमध्ये शहराच्या आजूबाजुचा काहीभाग अध्यादेशाद्वारे तत्कालीन नगरपालिकेत वर्ग करण्यात आला.

परंतु त्या अध्यादेशामध्ये सावेडी गावठाण वर्ग झाले नाही, त्यामुळे सावेडी गावठाण वगळून प्रभागरचना करण्यात यावी तसेच अ.नगर महानगरपालिकेकडे जर याबाबत काही पुरावे असतील तर हरकतींच्या सुनावणीवेळी ते पुरावे नगरवासियांच्या माहितीकरिता जाहीर करावेत, अशी मागणी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे शिवसेनेचे जिल्हा संघटक व सकल हिंदू समाजाचे अध्यक्ष दिगंबर लक्ष्मण गेंट्याल यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# कॅन्टोनमेंट बोर्ड व संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील भूभागाचा महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेत केला बेकायदेशीर समावेश

### प्रारूप रचनेवर मावळा प्रतिष्ठानने घेतली हरकत, नव्याने प्रभाग रचना तयार करण्याची मागणी

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५ साठी प्रभाग रचनेच्या प्रारूप आराखड्या मध्ये नियोजित प्रभाग क्र. ३ मध्ये संरक्षण विभागाचा व प्रभाग क्र.२, ५, १० आणि १३ मधे अहमदनगर कॅन्टोनमेंट / संरक्षण विभागाच्या अखत्यारीत असणारा भूभाग बेकायदेशीरपणे दर्शवून समाविष्ट करण्यात आला असून सदरचा भूभाग वगळून नव्याने प्रभाग रचना तयार करण्याची मागणी प्रारूप रचनेवर घेतलेल्या हरकतीत करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या कडे मावळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष निलेश म्हसे यांनी ही लेखी हरकत दाखल केली आहे. यात म्हंटले आहे की, आगामी मनपा निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. यात प्रभाग क्र. २ च्या प्रारूप आराखाड्यात निर्मलनगर परिसरातील पोलीस कॉलनी च्या मागील अहमदनगर कॅन्टोन्मेंट/ संरक्षण विभागाचा मोठ्या प्रमाणातील भूभाग दर्शविण्यात आलेला आहे. प्रभाग क्र. ३ च्या प्रारूप आराखड्यात दर्शविण्यात आलेला केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाचे सी. क्यू. ए. व्ही. विभागाचे कार्यालय व लगतचा परिसर दर्शविण्यात आलेला आहे. प्रभाग क्र. ५ च्या प्रारूप रचनेत दर्शविण्यात आलेला नगर मनमाड रोड चा तारकपूर परिसरातील चर्च, सेंट झेव्हियर्न विद्यालय, थोलर हॉस्पिटल, सिटी केयर हॉस्पिटल, साई एशियन हॉस्पिटल तसेच रस्त्याच्या समोरचा पूर्ण परिसर जीवन प्राधिकरण कार्यालय, एसटी बसस्थानक, राज्य कर्मचारी वसाहत, जुने आर. टी. ओ. कार्यालय, कृष्णा एन्क्लेव्ह, विश्रामगृह, आयकर भवन, राधाबाई काळे कॉलनी, रामवाडी झोपडपट्टी, फलटण चौकी चा परिसर हा भूभाग अहमदनगर कॅन्टोनमेंट च्या अखत्यारीत असून तो प्रारूप रचनेत दर्शविण्यात आलेला आहे.

प्रभाग १० च्या प्रारूप रचनेत दर्शविण्यात आलेला एस. टी. कार्यशाळा, गोकुळवाडी, कॅम्प कौलारू, मंगलमेट चा काही परिसर, राज चेंबर्स, ईदगाह मैदान,दिपाली थिएटर हा भूभाग देखील अहमदनगर कॅन्टोनमेंट च्या हद्दीतील असून तो देखील प्रारूप रचनेत दर्शविण्यात आलेला आहे. प्रभाग १३ च्या रचनेत दाखविण्यात आलेला जनरल पोस्ट ऑफिस, बुथ हॉस्पिटल, सी. एएस.आर. डी.अहमदनगर महाविद्यालय व नवीन आर. टी. ओ. कार्यालय हा भूभाग देखील अहमदनगर कॅन्टोन्मेंट च्या हद्दीतील असून प्रभाग रचनेत दर्शविण्यात आलेला आहे.

### मनपा व शासनाचा मोठा निधी आजपर्यंत झाला खर्च

प्रारूप रचनेत नमूद केलेला संरक्षण विभागाच्या व अहमदनगर कंन्टोन्मेंट च्या अखत्यारीत असलेला हा भूभाग आजतागायत तत्कालीन अहमदनगर नगरपरिषद किंवा विद्यमान अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याची कुठलीही कायदेशीर प्रक्रिया आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेली नाही. यासंदर्भात अहमदनगर कॅन्टोनमेंट कडे सदरच्या भूभागाच्या हस्तांतरण संदर्भात कागदपत्रांची माहिती विचारण्यात आली असता त्यांचेकडे देखील याची कुठलीही माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. याचा अर्थ तत्कालीन नगरपरिषद व विद्यमान महानगरपालिका प्रशासन हे सन १९५८ पासून बेकायदेशीर पणे सदरचा भूभाग मनपा हद्दीत दर्शवून त्याचा सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रभागरचनेत समावेश करून निवडणूक घेत आलेले आहेत. त्याठिकाणी नागरी सुविधा पुरवीत असून राज्य शासनाचा व मनपा चा मोठा निधी या ठिकाणी खर्च केला गेलेला आहे. व त्याचप्रमाणे आगामी अहिल्यानगर मनपा च्या निवडणुकीसाठी प्रभाग क. २, ३, ५, १० व १३ च्या प्रारूप प्रभाग रचनेत देखील पुन्हा याचा समावेश करण्यात आलेला आहे.

### भूभाग हस्तांतरणाची कायदेशीर प्रक्रियाच नाही

वरील पार्श्वभूमी पाहता सन १९५८ साली अहमदनगर कॅन्टोन्मेंट चा विशिष्ठ भूभाग हा तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याची कुठलीही कायदेशीर प्रक्रिया पार पडलेली नसून केवळ सदरचा भूभाग हा अहमदनगर नगरपरिषदेच्या हद्दीस लागून असल्यामुळे व काही प्रमाणात अहमदनगर कॅन्टोन्मेंट च्या मुख्य परिसरापेक्षा काहीसा तुटक असल्याने सदरचा भूभाग तत्कालीन अहमदनगर नगरपरिषद कडे हस्तांतरित करण्यावर काही प्राथमिक चर्चा आल्या असाव्यात, परंतु कुठलीही कायदेशीर प्रक्रिया यासाठी राबविली गेली असल्याचे कागदपत्र उपलब्ध नाहीत.

### जो भाग आपल्या हद्दीत नाही तो प्रभाग रचनेत कसा?

सदरचा भुभाग हा आजही केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीत येत असून त्याचे नियंत्रण हे पुणे येथील डिफेन्स ईस्टेट विभागाकडून होत आहे. त्यामुळेच सदरचा भूभाग हा आजही मनपाच्या हद्दीत अधिकृतपणे समाविष्ट झालेला नसल्याने सदरचा भूभाग हा अहिल्यानगर मनपा च्या प्रभाग रचनेत समाविष्ट करणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदर भूभाग वगळून नव्याने प्रभाग रचना करण्यात यावी अशी मागणी निलेश म्हसे यांनी या हरकतीद्वारे केली आहे.

## सावेडी व भिंगारमध्ये २ तरुणांची आत्महत्या

नगर - दोन तरुणांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना सावेडी व भिंगार मध्ये ८ सप्टेंबर रोजी घडल्या आहेत. अमोल राजेंद्र कानडे (वय ३१, रा. समता चौक सावेडी) व ललित शेरसिंग कुडीया (वय २४, रा. वाल्मिकी सोसायटी, पाथर्डी रोड भिंगार) अशी या मयत तरुणांची नावे आहेत.

यातील ललित कुडीया याने ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते १० च्या सुमारास घरात गळफास घेतला. ही बाब निदर्शनास येताच त्याचे नातेवाईक नरेश रमेश कुडीया यांनी त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.कोल्हे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पो.हे.कॉ.महेश विधाते हे करीत आहेत. तर अमोल कानडे याने रात्री ११ च्या सुमारास घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याला नातेवाईकांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.सचिन तोडमल यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले.

याबाबतच्या अहवालावरून तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पो.हे.कॉ.प्रवीण खंडागळे हे करीत आहेत.

## एसटी वाहकावर त्वरित कारवाई करावी अन्यथा 'उपोषण' करणार

### रिपब्लिकन सेनेच्या वतीने एसटी विभागीय नियंत्रण अधिकाऱ्यांना निवेदन

नगर - एसटी विभागीय नियंत्रण कार्यालयात धरणे आंदोलन करून रिपब्लिकन सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. शेवगाव आगारातील एका वाहकाने सुट्ट्या पैशावरून महिला प्रवाशाला दमदाटी करून मोबाईल फोडल्याप्रकरणी अद्यापही कारवाई न झाल्यामुळे संताप व्यक्त केला आहे. महिला स्वस्तिक चौक, पुणे बस स्थानक येथून शेवगाव-पुणे बसने प्रवास करत होत्या. तिकीटासाठी वाहकांना ११० रुपये दिले असता येरवडा येथे उतरताना उरलेले ८ रुपये मागितले. त्यावेळी वाहकाने माझ्याकडे सुट्टे नाहीत, ४ रुपये घेऊन वाकडला उतरा असे मोठ्या आवाजात सांगत प्रवाशाला दमदाटी केली. यावर महिलांनी आक्षेप घेतला असता वाहकाने उद्धट वर्तन करत त्यांच्याशी हूज्जत घातली. बस क्रमांकाचा फोटो मोबाईलमध्ये टिपण्याचा प्रयत्न करताच संतप्त झालेल्या वाहकाने मोबाईल हिसकावून खाली आपटल्याने मोबाईलचे नुकसान झाले. या गंभीर प्रकाराची तक्रार रामवाडी येथील विभागीय नियंत्रण अधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. मात्र, एक महिना उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने आज पुन्हा स्मरणपत्र देऊन कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले, विवेक विधाते, राजू उल्लारे, संजय ताकवले आदी उपस्थित होते.



एसटी वाहकावर कारवाई करावी या मागणीचे निवेदन रिपब्लिकन सेनेच्यावतीने एसटी विभागीय नियंत्रण कार्यालयात देण्यात आले.

८ दिवसात संबंधित वाहकावर कारवाई न झाल्यास रिपब्लिकन सेनेच्या वतीने विभागीय कार्यालयासमोर उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## सुरेशलाल गुंदेचा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बुरुडगल्ली येथील पवन घी डेपोचे संचालक सुरेशलाल छगनलाल गुंदेचा (वय ७१) यांचे ९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे भाऊ असा परिवार आहे. सुरेशलाल हे सपना, पूनम व महेश नागरी पतसंस्थेचे संचालक पवन गुंदेचा यांचे वडील, रमेश गुंदेचा यांचे बंधू, आनंद गांधी, सुशील चुत्तर यांचे सासरे व महावीर पितळे यांचे दाजी होत.

## फरियाज सय्यद यांचे अल्प आजाराने निधन



नगर - मुकुंदनगर येथील अभिलाषा कॉलनीतील रहिवासी फरियाज रफीक सय्यद (वय ४१) यांचे ८ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर हजरत जलाल शाह बुखारी कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.

त्यांच्यामागे पत्नी, आई, वडील, ३ मुली, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे. एमआयडीसीतील वर्कशॉप राज मोटर्सचे ते संचालक होते.

## अनिता राठोड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील गंज बाजारातील रहिवासी अनिता अरविंद राठोड (वय ६३) यांचे ३ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे पाषाण वैकुंठभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## सौ.सुमन शहाणे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सौ. सुमन गोविंद शहाणे (वय ७६) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गोविंद रघुनाथ शहाणे यांच्या पत्नी, भगवान महावीर पथ येथील नागेश अलंकार गृहचे मालक नागेश शहाणे यांच्या मातोश्री होत.

# ड्रेनेज, पाणीटंचाई आणि रस्त्यांच्या समस्यांबाबत मनपा कार्यालयासमोर हलगी-नाद उपोषण सुरु

नगर - नागरिकांना मूलभूत नागरी सुविधांच्या अभावामुळे प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. ड्रेनेज लाईन फुटणे, आठ-दहा दिवसांनी मिळणारा पाणीपुरवठा आणि रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे या तिहेरी समस्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर नागरिकांनी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने मनपा कार्यालयासमोर हलगी-नाद करीत बेमुदत उपोषण सुरू केले.

बोल्हेगाव परिसरातील पोलीस कॉलनी व धर्मवीर चौक परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून ड्रेनेज लाईन फुटलेली असून दिवसरात्र मळमिश्रित घाणपाणी वाहत आहे. या घाणीमुळे संपूर्ण परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्यावर संकट ओढवले आहे. तसेच चिंतामणी पोलीस कॉलनीमध्ये गेल्या वर्षभरापासून पाणीपुरवठा केवळ आठ-दहा दिवसांनी होत असल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांनी घरपट्टी व पाणीपट्टी वेळेवर भरूनही पाण्यासाठी वणवण करावी लागते, याशिवाय सनफार्मा शाळा ते चिंतामणी पोलीस कॉलनीदरम्यानच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नुकत्याच झालेल्या अपघातात एका महिलेला पडून हात मोडण्याची वेळ आली. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक धोकादायक असल्याने तातडीने मुरुम टाकून रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी उपोषणकर्त्यांनी केली.



ड्रेनेज, पाणीटंचाई आणि रस्त्यांच्या समस्यांबाबत दखल घेतली जात नसल्याने सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीन मनपा कार्यालयासमोर हलगी-नाद उपोषण सुरु करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे, दादासाहेब नेटके, माणिक कांबळे, अंकुश मोहिते, काशिनाथ सुलाखे पाटील, सुनील ढोले, राहुल ठोकळ, येशुदास वाघमारे, भगवान जगताप, पप्पू चांदणे, प्रतीक ससाने, निखिल वैरागर, सीमा सकट, दिपाली चांदणे, अर्चना चव्हाण, मीना कांबळे, आशा नेटके, संजय सोनवणे, महेश सकट, संदीप सकट आदींसह महिला व नागरिक उपस्थित होते.

## दुचाकीचा कट लागल्याच्या करणातून नगरमध्ये २ तरुणांवर ५ जणांच्या टोळीने केला खुनी हल्ला

नगर - दुचाकीचा कट लागल्याच्या किरकोळ वादातून ५ जणांच्या टोळीने दोघा तरुणांना लाथा-बुक्क्यांनी आणि लोखंडी रॉडने मारहाण करत खुनी हल्ला केल्याची घटना निलक्रांती चौकाजवळील हनुमान पान शॉपवर ८ सप्टेंबर रोजी रात्री घडली. पोलिसांनी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून, तिघे पसार झाले आहेत.

याबाबत अभिषेक साखरे (वय २०, रा. दातरंगे मळा) याने फिर्यादीत म्हटले की, तो व चेतन बनसोडे (वय १९, रा. वारुळाचा मारुती) रात्री ९ वाजता मित्रांसोबत गप्पा मारत होते. पान घेण्यासाठी चेतनच्या दुचाकीवर निघाले असता, दिल्लीगेट रोडवर एका व्यक्तीने त्यांना शिवी दिली. चेतनने माफी मागून पुढे निघाले. हनुमान पान शॉपवर पान खात असताना ऋतीक साळवे दुचाकीवर आला आणि चेतनची दुचाकी आडवी लावली. ऋतीकने चेतनला मित्रांशी बोलल्याचा जाब विचारला. चेतनने स्पष्टीकरण दिले, पण तेवढ्यात अमोल पाडळे, अक्षय पवार, रुपेश गायकवाड आणि निखील साळवे धावत आले. अमोलने अभिषेकच्या तोंडावर जोरदार बुक्का मारला, ज्यामुळे त्याचे नाक फुटले. अमोलच्या हातात लोखंडी रॉड होता.

पाचही जणांनी अभिषेक आणि चेतनला मारहाण केली. अभिषेकने चेतनला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण अमोलने रॉडने चेतनच्या डोळ्याजवळ आणि डोक्यावर वार केले. चेतन बेशुद्ध पडला, तरीही त्याला लाथांनी तुडवले गेले. अभिषेकने चेतनला मिठी मारून वाचवले. यावेळी एका पोलिस कर्मचार्याने धावत येऊन दोन संशयित आरोपींना पकडले, पण इतर तिघे पळून गेले.अभिषेकने मित्र पियुष उंबरवालला फोन करून घटना सांगितली. पियुष आणि अभिजीत आल्हाट यांनी चेतनला तात्काळ सिव्हील हॉस्पिटलला नेले.

पोलिसांनी अमोल पाडळे, ऋतीक साळवे, अक्षय पवार, रुपेश गायकवाड आणि निखील साळवे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हे सर्व निलक्रांती चौकाजवळ राहणारे आणि ऋतीकचे मित्र आहेत.

पोलिसांनी तपास सुरू केला असून, पसार संशयित आरोपींचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रातून चोरी

नगर - महापालिकेच्या विळद जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारात कंपाऊंड च्या आत असलेल्या जुन्या ट्रान्सफार्मर मधील ३५ हजार रुपये किंमतीची कॉपर कॉईल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना ६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ ते ७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.३० वाजण्याच्या कालावधीत घडली आहे.

याबाबत शहर पाणी पुरवठा योजनेचे मुख्य नियंत्रक संजयकुमार विलास भिंगारकर (रा. विळद जलशुद्धीकरण केंद्राजवळ, विळद) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अज्ञात चोरट्यांनी विळद जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारात कंपाऊंड च्या आत असलेल्या जुन्या ट्रान्सफार्मर मधील ३५ हजार रुपये किंमतीची कॉपर कॉईल चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## नगर शहरासह उपनगरात स्वच्छतेचा उडाला बोजवारा

(पान १ वरुन)

वसाहतींमध्ये आठवड्यातून एकदाच झाडलोट होत आहे. वसाहतींमध्ये नागरिकांच्या घरासमोर झाडांचा पालापाचोळा व इतर कचरा पडलेला असतो. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

### कचऱ्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका

शहरातही ठिकठिकाणी रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे मोठ मोठे ढीग साचलेले दिसून येत असून महापालिकेने कचरा संकलनाचा ठेका दिलेल्या संस्थेकडून ३-४ दिवस हा कचरा उचलला जात नसल्याचे दिसून येत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या कचऱ्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. नगरकर गेल्या अनेक वर्षापासून पाणी, स्वच्छता, लाईट, रस्ते या सुविधा चांगल्या मिळण्यासाठीच अजून लढा देत आहेत असे अजून किती वर्ष चालणार आणि लोकांना कर भरून सुद्धा या समस्यांमधून सुटका कधी मिळणार की कायम या समस्या अशाच राहणार आहेत.

### मोकाट कुत्र्यांचा उपद्रवही वाढला

शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा सर्रासपणे वावर सुरू असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. महापालिकेकडून कुठल्याही उपाययोजना होताना दिसत नाहीत. शहरात रस्त्याच्या कडेला साचलेल्या कचर्याच्या ढिगाऱ्यावर मोकाट कुत्र्यांच्या टोळ्या पाहावयास मिळत आहे. ही हिंसक कुत्री हल्ला करत असल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. अशीच एक घटना २७ ऑगस्ट रोजी सकाळी सावेडी उपनगरातील वार्ड क्र.२ मधील लक्ष्मीनगर येथे घडलेली आहे. या परिसरातील उमा विजय कासारे (वय ३९, रा.लक्ष्मीनगर) यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्लूयात त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. या भटक्या कुत्र्यांच्या सुळसुळाटाला हे कचऱ्याचे साचलेले ढीगच कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे महापालिकेने कचरा संकलनावर लक्ष केंद्रित करून निदान सण उत्सवाच्या काळात तरी नागरिकांचे आरोग्य चांगले राहील याची दक्षता घ्यावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

मेथ्यांमुळे शरीरातील उर्जा वाढते. मेथी दाण्यांमुळे प्रतिकारशक्तीतही वाढ होते. नियमित मेथीचे सेवन करणाऱ्या व्यक्तीला अशक्तपणाची जाणीव कमी होऊन उत्साह आणि चैतन्य वाटत राहते. त्याचप्रमाणे हाडे बळकट होण्यासाठी मेथी उपयुक्त असते.

जेवण घेताना आधी गोड खाऊ नये, असे सांगितले जाते. ते बरोबर आहे. सुरुवात नेहमी मसालेदार पदार्थाने करावी आणि शेवट गोड खाऊन करावा. त्याचे अनेक फायदे आहेत. जेवण घेताना आपल्या जेवणात गोड पदार्थ हटकून असतात, मात्र काही वेळा आपण प्रथम गोड पदार्थ खाण्यावर भर देतो. तो चुकीचा आहे.

## पाककला

### पौष्टिक हलवा

**साहित्य :** कपभर खजुराचा गर, एक कप दूध, अर्धा कप तूप, काजू, १० पिस्ते, साखर, थोडी वेलची.

**कृती :** खजुराचे लहान तुकडे करून दूध, खजूर, साखर शिजवा. उकळी आल्यावर तूप सोडा. थोडे काजू त्यात सोडा. मिश्रण आटल्यावर उतरवा. आता काजू, पिस्ते व वेलची घाला. पौष्टिक हलवा तयार होईल.

## वास्तू

❊ वास्तूशास्त्रानुसार जर आपल्या हातात नकारात्मक उर्जा प्रवेश करत असेल तर येणारा प्रत्येक दिवस नवीन वाद घेऊन येत असतो. घरात नीटनेटकेपणा असला तर सकारात्मक उर्जा प्रवेश करते व घरातील सदस्यांच्या विचारात परिवर्तन घडवून आणते. घरातील वस्तूंवर बसलेली धूळ दररोज साफ करावी. तसे केल्याने घरात येणाऱ्या नकारात्मक उर्जेचा प्रभाव कमी होतो. भिंतीवरील बंद पडलेले घड्याळ व बिनकामाचे सामान बाहेर काढा.

❊ एखादी श्रीमंत व्यक्ती काही कारणास्तव स्वतःचे घर विकून दुसरीकडे चालली असेल, तर राहण्यासाठी किंवा कारखान्यासाठी असे घर कधीही विकत घेऊ नये.

## सौंदर्य

अर्धा चिरलेल्या लिंबाच्या फोडीत थोडी पिठीसाखर पसरा. हाताचे कोपरे, गुडघ्यांच्या वाट्या व घोट्याच्या उंचवट्यावर घासा. खांदे आणि मान यांनाही हे मिश्रण लावा. यामुळे तेथील निब्बर त्वचा मृदू होईल.

## सल्ला

❊ थंडीत फ्रेश गाजर व टोमॅटो ज्यूस प्यायला पाहिजे. त्याने चेहरा ताजातवाना होतो.

❊ तांदूळ शिजवताना पाण्यात थोडा लिंबाचा रस आणि मीठ घालावे. यामुळे भात पांढराशुभ्र होतो आणि चवीलाही चांगला लागतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ११ सप्टेंबर २०२५

**भरणी श्राद्ध, पंचमी श्राद्ध, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, अश्विनी १३।५८, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका. अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल.

**वृषभ :** तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल.

**मिथुन :** तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस.

**कर्क :** आजचा दिवस विशेष साजरा करण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत कॅण्डललाईट डीनरचा आस्वाद घ्या. नव्या कल्पनांची परिक्षा घेण्यासाठी योग्य दिवस आहे.

**सिंह :** संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**कन्या :** आपला मूड बदलण्यासाठी एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हा. आज तुमची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे तुम्हाला तुमच्या कामावर लक्ष केंद्रीत करणे जड जाईल. तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल.

**तूळ :** आजच्या दिवशी तुम्ही प्रेमपाशात बांधले जाणार आहात. या परमानंदाचा अनुभव घ्या. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ.

**वृश्चिक :** तुमच्या नवीन योजना, प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे. तुमच्या खासगी आयुष्यात मित्र प्रमाणाबाहेर हस्तक्षेप करतील.

**धनु :** आपल्या पालकांना खुश करण्यासाठी अभ्यास आणि खेळ यांचा समतोल साधा. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल.


**मकर :** अन्य देशांतील लोकांशी व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करण्यासाठी सध्याचा काळ अतिशय योग्य आहे. वैवाहिक आयुष्य आजच्याइतकं सुखद कधीच नव्हतं, याची प्रचिती तुम्हाला येईल.

**कुंभ :** जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे आर्थिक अडचणींवर मात कराल.

**मीन :** महत्त्वाच्या आवश्यक गोष्टींचीच आज खरेदी करा. तुम्ही साजरे करण्याच्या मूडमध्ये असाल आणि कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी यांच्यासाठी खर्च करून मजा लुटाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२६० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अरिष्ट, आपत्ती, बला, विपदा ४) इच्छा, आकांक्षा, मनीषा ७) शेवगावचे संत १०) नंतर पुन्हा ११) समर्थ रामदास स्वामींचे वास्तव्य असलेले एक ठिकाण १४) आठवड्यातील सुट्टीचा दिवस १६) नारळाचे झाड १७) स्त्री, बाई, महिला १८) दुर्दशा, परवड २०) आंब्याचे बी, बाठा २२) एक राजा ज्याच्यावर वि. स. खांडेकर यांची गाजलेली कादंबरी आहे २४) पांघरण्याचे एक उंची वस्त्र, शाल २५) सोने, सुवर्ण, कांचन

**उभे शब्द :-** १) नगर जिल्ह्यातील एक तालुका २) भांडखोर (स्त्री) ३) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप ४) काज, कार्य ५) मोठा, महान, थोर ६ घोषणा ८) माणसांतील श्रेष्ठ ९) नजीक, समीप ११) गावाच्या सीमेच्या आतील गावठाणाव्यतिरिक्त सारी जमीन १२) लक्ष्मीपती, विष्णू १३) गुच्छ, समूह (केळीचा) १५) गणपतीचे एक नाव १९) खूण, चिन्ह २०) साधारण दोन मैल लांबीचे पूर्वीचे एक माप २१) काढून टाकलेला, आऊट २३) गाडी, वाहन (विशेषत: अंतराळात)

शब्दगंध क्र. ७२५९ चे उत्तर



# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वाटेल त्या कारणासाठी स्वतःचा पराक्रम खर्च करण्यात खरी हिंमत नसून, योग्य कारणासाठी प्राणांची बाजी लावण्यात खरा पराक्रम आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पोलिओने पाय लुळा का होतो?

पोलिओ हा विषाणूंमुळे होणारा एक रोग आहे. तीन प्रकारच्या विषाणूंमुळे हा रोग होतो. या रोगाचे जंतू रुग्णाच्या विष्ठेतून पिण्याच्या पाण्यात मिसळले जातात व निरोगी लोकांना हा रोग होतो. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था व मलमूत्र विसर्जनाची, विल्हेवाटीची व्यवस्था नसलेल्या देशांमध्ये हा रोग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. भारतात या सुविधांचा अभाव असल्याने पोलिओ आढळून येतो. पाच वर्षांखालील मुलांना हा रोग प्रामुख्याने होतो. दरवर्षी दर लाख लोकसंख्येमागे १५ जण पोलिओमुळे लुळे होतात.

पोलिओचे विषाणू दूषित पाण्यातून तोंडावाटे शरीरात प्रवेश करतात. पचनसंस्थेत प्रवेश केल्यानंतर सौम्य प्रकारचा आजार होतो (यात ताप, उलट्या व जुलाब ही लक्षणे असतात) व बऱ्याचदा तो आपोआप बरा होतो. अशा रुग्णांपैकी क्वचित एखाद्याच्याच आतड्यातून हे विषाणू रक्तात जातात. रक्तातून स्नायूत व मग मज्जासंस्थेत शिरतात. मज्जासंस्थेच्या ज्या भागावर वा नसेवर विषाणू हल्ला करून तिला निकामी करतात, त्यानुसार त्या नसेशी संबंधित असे स्नायू लुळे पडतात. सामान्यपणे पाय लुळा पडतो, कधी कधी हात, तर कधी हात व पाय वा शरीर लुळे पडू शकते. रक्तात वा स्नायूत विषाणू असल्यास रुग्णाला जर इंजेक्शन दिले गेले, तर हातपाय लुळे पडण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्याच्या काळात व विशेषतः पोलिओची साथ चालू असल्यास ताप, हगवण झाल्यास चुकूनही इंजेक्शन देऊ नये.

पोलिओ टाळण्यासाठी महत्त्वाचा उपाय म्हणजे सर्व लहान मुलांना पोलिओची लस पाजणे. जन्माच्या दिवशी पहिली लस दिली जाते. त्यानंतर दीड, अडीच, साडेतीन महिने वय असताना व नंतर दीड वर्ष वय असताना परत ही लस पाजली जाते. ही लस दिल्यास पोलिओ होत नाही. दूरगामी प्रतिबंध करण्यासाठी राहणीमानाचा दर्जा उंचावणे, सुरक्षित पाण्याचा पुरवठा करणे व मलमूत्र विसर्जन विल्हेवाटीसाठी सुयोग्य व्यवस्था करणे, हे आवश्यक ठरते. पोलिओने पाय लुळा पडल्यास भौतिकोपचार तसेच कॅलीपर (पायाचा आधार) वगैरे वापरून शक्ती परत आणण्याचा प्रयत्न करता येतो. काही वेळा शस्त्रक्रियेचाही उपयोग होतो. अर्थात, हे सर्व करण्यापेक्षा लसीकरण करून रोग टाळणे, हेच योग्य ठरेल.


### जाळ्यात अडकलेला सिंह

एका वनात एक सिंह राहत होता. उन्हाळ्याचे दिवस होते. फारच गरम होऊ लागले म्हणून सिंहाची स्वारी एका छायाळ वृक्षाखाली आरामात झोपी गेली. तेथेच उंदरांची वस्ती होती. शांत झोपलेले सिंह महाराज पाहून उंदीर त्याच्या अंगा-खांद्यावर खेळू लागले. थोडा वेळ सिंहाने हे कसे तरी सहन केले; परंतु उंदरांचा त्रास फारच वाढल्याने त्याची झोपमोड झाली. रागानेच त्याने एका उंदराला आपल्या पंज्यात पकडले. त्याला आता फाडून खाणार, तोच उंदराने गयावया करीत त्याला म्हटले,

''महाराज, चुकलो मी. मला क्षमा करा. पुन्हा माझ्या हातून अशी आगळीक घडणार नाही. आपण तर सर्व प्राण्यांचे राजे. आपण महान. मी तर आपणापुढे अगदीच किरकोळ. माझ्या रक्ताने आपले पवित्र हात विटाळू नका. मला जीवदान देणे हे आपल्या मोठेपणाला साजेसे होईल.'' हे ऐकून सिंहाला त्याची दया आली. त्याने उंदराला सोडून दिले. जाता-जाता उंदीर म्हणाला, ''सिंह महाराज, मी आपले उपकार जन्मात विसरणार नाही.'' अशा प्रकारे काही दिवस गेले. सिंह महाराज असेच एकदा वनात फिरत फिरत नेमके त्याच झाडाखाली आले. तेथे शिकाऱ्याने आधीच एक जाळे लावले होते. त्यात सिंह महाराज अडकले. जाळ्यात जेरबंद होताच सिंहाने सर्व शक्ती एकवटून जाळ्यातून सुटण्याचा प्रयत्न केला असता तो त्यात जास्तच गुरफटला. अखेर निराश झालेला सिंह रागाने ओरडू लागला. हा आवाज उंदराने ओळखला. तो धावतच सिंहाजवळ आला. पाहतो, तर सिंह महाराज जाळ्यात फसलेले.

मग उंदीर म्हणाला, ''महाराज, असे निराश होऊन भिऊ नका. स्वस्थ पडून राहा.'' असे म्हणत उंदराने आपल्या तीक्ष्ण दातांनी जाळे कुरतडायला सुरुवात केली. थोड्याच वेळात सिंह महाराज जाळ्यातून मोकळे झाले. त्यांच्यावरील संकट टळले. सिंहाने केलेल्या उपकाराची परतफेड उंदराने अशा प्रकारे केली.

**तात्पर्य :** कोणाला कमी हलके समजू नये. आपण एखाद्यावर उपकार केले, तर ऐन वेळी त्यातील एखादा तरी आपल्या मदतीला धावून येतो.



## जीवन का अमृत (भाग १)

### गुरू और परमात्मा

महापुरुष हमें बार-बार समझाते हैं कि हमें प्रभु से अलग हुए, प्रभु से बिछुड़े हुए लाखों-करोड़ों साल हो गए हैं और हमारी आत्मा एक योनि से दूसरी योनि में भटक रही है। वह चौरासी लाख जियाजून के चक्कर में लगी हुई है, उसमें फँसी हुई है, उसमें अटकी हुई है और उन योनियों में वह कष्ट ही उठाती रहती है। कर्मों के विधान के साथ-साथ उसके ऊपर काल का जो जाल है, वह बिछा रहता है। हमारी रूह अपने आप उस जाल से नहीं निकल सकती। जब तक हम उस जाल में फँसे रहेंगे, तब तक एक दुःख-दर्द के बाद दूसरा दुःख-दर्द हमारे साथ रहेगा। यहाँ पर बाबा फरीद जी हमें यही समझा रहे हैं कि जब हमें यह मालूम हो जाए कि जो हमारा असली रूप है, वह शारीरिक नहीं बल्कि आत्मिक है, तो फिर हममें प्रभु से मिलने की तड़प और भी जाग उठती है और इसी के बारे में आगे बता

**तै सहि मन महि कीआ रोसु ।।**
**मुझु अवगन सह नाही दोसु ।।**

यहाँ पर आत्मा परमात्मा से कह रही है कि हे प्रीतम! लगता है आप मुझ से रूठ गए हो। जब हमारा प्रियतम हम से रूठ गया हो, हम से बातचीत भी नहीं करता हो, तो हमें लगता है कि उसे गुस्सा आ गया है और हमें समझ में नहीं आता कि हम कैसे उस अवस्था में पहुँचें, जिसमें कि हम पहले थे। यहाँ पर उसी के बारे में बता रहे हैं कि 'हे प्रीतम! तुम मुझसे रूठे क्यों हो, तुम मुझसे नाराज़ क्यों हो? जिसके कारण तुम रूठे हो, उसमें तुम्हारा कोई दोष नहीं है। जो अवगुण हैं, जो दोष हैं, वे मुझ में हैं।' तो वे उस अवस्था की बात कर रहे हैं, जहाँ पर इंसान को यह मालूम हो जाता है कि उस परमेश्वर के ज़रिये ही यह सारी सृष्टि चल रही है, कर्तापुरुष भी वही है, उसने ही हमें सँभालना है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

१०० मि.ली. इमली का ज्यूस, १० ग्रॅम हींग, १० ग्रॅम कपूर, १५ मि.ली. पानी मिलाकर स्प्रे करें। इससे कई प्रकार की कीट भाग जाती है। विशेष लिफ मायनर के लिए यह बहुत ही प्रभावी दवा है।

४) मिलीबग्ज और थ्रिप्स (रस चूसनेवाली कीट तथा सफेद मक्खियों) के नियंत्रण के लिए : २०० लि. पानी में ५ किलो देशी गाय का गोबर, ५ किलो गोमूत्र यह सब २४ घण्टे भिगोकर इसे छानकर स्प्रे करें। इससे डाऊनी, थ्रिप्स भी कम होती है और सभी प्रकार के अन्न द्रव्य भी फसल के लिए मिलते हैं। अथवा ५ प्रतिशत नीम अर्क, ३ प्रतिशत गोमूत्र मिलाकर छिड़काव कर सकते है। अथवा १५ ली. पानी, ३० ग्रॅम व्हर्टिसिलीयम बुरशी, ५०० मि.ली. दूध मिलाकर छिड़काव कर सकते है।

**५) फफूंदी के लिए (फफूंदी रोधक) :**

### आज्ञा चक्र

टायकोडर्मा एक किलो २०० ली. पानी में मिलाकर शाम के समय जमीन गीली हो तब एक एकड़ जमीन पर छिड़काएं (हो सके तो नीम की पत्तों की डाली से छिड़काएँ) अथवा ५० किलो गोबर की खाद या ५० किलो गीली मिट्टी में ट्रायकोडर्मा एक किलो मिलाकर शाम के समय जमीन गिली हो तब एक एकड़ जमीन पर छिड़काएँ। अथवा ट्रायकोडर्मा एक किलो २०० लि. पानी में मिलाकर शाम के समय (धूप कम होने के बाद) फसल पर छिड़काव कर सकते हो। अथवा २०० ग्रॅम वायविडंग कूटकर (आटा बनाकर) ३ लीटर गोमूत्र २०० लिटर पानी में मिलाकर दो दिन तक टंकी में रखें । टंकी का मुख मोटे कपड़े से बाँधकर रखें। प्रतिदिन इस मिश्रण को दो बार डंडे से घड़ी की दिशा में हिलाएं और इसे छानकर छिड़काव कर सकते है। ५ अथवा ५ लि. देशी गाय का छांछ दो दिन तक तांबा (कॉपर) के बर्तन में ज्यादा खट्टा बनने के लिए) रखकर २०० लिटर पानी के साथ १०० ग्रॅम हिंग, १०० ग्रॅम हल्दी मिलाकर फसल पर फंवार सकते है।

**६) फफूंदी के प्रकार और उसके प्रति किये गये उपाय :** १. करपा (पत्तों का जलना) के नियंत्रण के लिए : सवेरे सूर्योदय के पहले जिस दिशा से हवा आती है उस दिशा में देशी गाय के गोबर की गोणियां जलाकर धुआँ निकालें। बाद में वह राख फसल पर छिड़काएँ। इ) ५ लि. देशी गाय का छांछ दो दिन तक तांबा (कॉपर) के बर्तन में रखकर २०० लि. पानी के साथ १०० ग्रॅम हिंग, १०० ग्रॅम हल्दी मिलाकर फसल पर छिड़काएँ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सर : बंडू, सांग पाहू पृथ्वी आणि चंद्रामध्ये काय संबंध आहे?
बंडू : सर, भावा-बहिणीचा.
सर : काय ?
बंडू : हो सर, कारण आपण पृथ्वीला माता आणि चंद्राला मामा म्हणतो..

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ जगातील टॉप १० मध्ये असलेले भारतातील विमानतळ कोणते?

– चेन्नई विमानतळ

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

आयुर्वेदामध्ये या व्याधीबद्दल सांगितले आहे की, गर्भाशय लेखन (क्युरेटीन), पंचकर्म चिकित्सा, आणि स्तंभन चिकित्सा अति प्रमाणात करणे, थंड पदार्थांचे जास्त प्रमाणात सेवन करणे, मानसिक ताणतणाव, अति व्यायाम, जास्त काळ उपवास, तसेच अति लैंगिक संबंध या सर्व कारणांनी आर्तव क्षय म्हणजेच अनार्तव होऊ शकते.

**अनार्तवाचे दोन प्रकार आहेत :**

१) प्राथमिक अनार्तव (Primary menorrhoea)

२) दुय्यम अनार्तव (Secondary menorrhoea)

**१) प्राथमिक अनार्तव**

(Primary menorrhoea) :

प्राथमिक अनार्तव शारीरिक व्यंग आणि मानसिक ताणतणाव या दोन्ही गोष्टींमुळे होते.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

शारीरिक व्यंग, गर्भाशय नसणे किंवा अत्यंत लहान आकारात असल्यामुळे गर्भाशयाच्या आतील अस्तराची (Endmetrium) वाढ होत नाही. अशा मुलींना मासिक पाळी येतच नाही. पाळी न येणे म्हणजे मातृत्वाचे सुख न मिळणे होय. यावर बरेचदा काहीही इलाज करता येत नाही. आहे त्या परिस्थितीला सामोरे जाऊन जीवनाची रूपरेषा ठरवून घ्यावी. भविष्यात आपल्या भावी पतीला व सासरच्यांना ही घटना सांगावी; नाही तर गैरसमज होतात. पाळी येत नसली तरी स्त्रीत्वाची इतर लक्षणे स्त्रीमध्ये असतात. त्यामुळे ती सुखाचा संसार करू शकते.

**१) योनीमध्ये पडदा असणे किंवा योनिद्वार पटल बंद असणे :**

यामध्ये स्त्रीला शरीरात दर महिन्याला पाळी येते. मात्र रक्तस्राव योनिमार्गे बाहेर न पडता तो गर्भाशयात तसेच गर्भनलिकेमध्ये साचतो. त्यामळे गर्भाशय व गर्भनलिका फुगतात. अशा अवस्थेत स्त्रीच्या पोटात भयंकर वेदना होतात. वेदना झाल्यामुळे पाळी येईल असे वाटते; परंतु पाळी येत नाही. योनिद्वार पटल (Hymen) बंद असेल, त्याला जरासुद्धा बारीक छिद्र नसेल तरीही पाळी येत नाही. या दोन्ही अवस्थेमध्ये ओटीपोटात वेदना होतात. अशा वेळी सोनोग्राफी केली असता गर्भाशयात साचलेला रक्तस्राव दिसतो. या अवस्थेमध्ये शस्त्रक्रिया करतात आणि योनी पटलद्वाराला छोटासा छेद दिला जातो. त्यानंतर लगेच मासिक पाळी सुरू होते. **(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# जीवनाचा सन्मान : आत्महत्या प्रतिबंधासाठी सामाजिक जाणीवेची गरज

दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ आत्महत्या या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नसून, तिच्या मुळाशी असलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक घटकांवर चर्चा घडवून आणण्यासाठी असतो. आत्महत्या ही फक्त वैयक्तिक निर्णयाची परिणती नसून ती एका व्यापक सामाजिक परिस्थितीची उपज आहे, असा समाजशास्त्रीय दृष्टिकोन घेऊन पाहिले तर या समस्येची व्याप्ती आणि गांभीर्य अधिक स्पष्टपणे समजते. व्यक्तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे घटक अनेक स्तरांवर कार्यरत असतात. त्यामध्ये कुटुंबातील नातेसंबंध, आर्थिक ओढाताण, सामाजिक दबाव, बेरोजगारी, मानसिक आरोग्याचा अभाव, सांस्कृतिक अपेक्षा, राजकीय अस्थिरता, आणि आधुनिक जीवनातील एकाकीपणा इत्यादी घटकांचा समावेश होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्या प्रतिबंधाचा विचार करताना केवळ वैद्यकीय वा मानसोपचारक दृष्टिकोन पुरेसा ठरत नाही; त्यासाठी सामाजिक संरचना, सांस्कृतिक पद्धती आणि आर्थिक विषमता यांचाही सखोल विचार आवश्यक ठरतो.

मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर आत्महत्या हा प्रसंग तसा नवीन नाही. प्राचीन काळापासून विविध समाजांमध्ये आत्महत्येकडे वेगवेगळ्या नजरेने पाहिले गेले आहे. कुठे ती पराक्रमाचे, त्यागाचे किंवा सन्मानाचे प्रतीक मानली गेली, तर कुठे ती पाप, दुर्बलता किंवा अपमानाचे लक्षण समजली गेली. मात्र आधुनिक समाजशास्त्र आत्महत्येकडे केवळ वैयक्तिक कृती म्हणून न पाहता, ती समाजातील विसंगती, तणाव आणि असमानतेचे परिणाम म्हणून विश्लेषित करते. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येवर केलेला सखोल अभ्यास आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांनी आत्महत्या ही वैयक्तिक घटना नसून सामाजिक घटना आहे, असे स्पष्ट केले आहे. समाजातील एकात्मता आणि नियंत्रणाच्या प्रमाणावर आत्महत्येचे प्रकार ठरतात, असे त्यांनी दाखवून दिले. व्यक्ती समाजाशी निगडित नातेसंबंधातून प्रेरणा, आधार आणि जीवनमूल्ये घेत असते. जेव्हा हे संबंध तुटतात, जेव्हा समाजाकडून आधाराऐवजी दडपण वाढते किंवा जेव्हा व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकली जाते, तेव्हा तिच्या जगण्याची आशा मंदावते. आत्महत्या म्हणजे त्या आशेचा अंत असतो. त्यामुळे आत्महत्येकडे फक्त मानसिक आरोग्याचा प्रश्न म्हणून न पाहता समाजाच्या व्यापक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. एमिल दुर्खीम या समाजशास्त्रज्ञाने आत्महत्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण करून हे दाखवून दिले की व्यक्तीच्या जीवनातील एकाकीपणा, समाजाशी असलेले तुटलेले नाते, मूल्यांचा गोंधळ किंवा अत्यधिक सामाजिक नियंत्रण या कारणांनी आत्महत्या घडते. त्याच्या अभ्यासामुळे हे लक्षात येते की आत्महत्या ही वैयक्तिक न राहता सामाजिक वास्तवाशी जोडलेली घटना आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर आत्महत्येच्या मुळाशी 'सामाजिक संबंधांचा अभाव' हे एक महत्वाचे कारण आहे. आधुनिक काळात जरी तंत्रज्ञानाने आपल्याला जगाशी जोडले असले तरी प्रत्यक्ष मानवी नाती, संवाद आणि आधार यांचा अभाव वाढत चालला आहे. यामुळे लोक मानसिकदृष्ट्या कमकुवत होत आहेत. दुसरीकडे, समाजाने मानसिक आरोग्याकडे अद्यापही 'कलंकित' नजरेने पाहण्याची प्रवृत्ती कायम ठेवली आहे. एखादी व्यक्ती नैराश्यात आहे, तिला मानसोपचाराची गरज आहे, हे मान्य करण्याऐवजी तिला वेडसर, असामान्य समजले जाते. परिणामी लोक मदत घेण्याऐवजी शांतपणे वेदना सहन करत राहतात आणि टोकाचा निर्णय घेतात. आज जगात आणि भारतात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ८ लाखांहून अधिक लोक आत्महत्या करतात, म्हणजे दर ४० सेकंदाला एक व्यक्ती स्वतःचे जीवन संपवते. भारत या आकडेवारीत अग्रभागी आहे. आजच्या काळात आपण पाहतो की आत्महत्येच्या घटनांमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, बेरोजगार तरुणांच्या आत्महत्या आणि वृद्धांच्या आत्महत्या ही काही ठळक उदाहरणे आहेत. युवकांसाठी रोजगाराची असुरक्षितता, करिअरचा दबाव, नातेसंबंधातील ताणतणाव, पालक-समाजाच्या अपेक्षा या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करतात. शेतकऱ्यांच्या बाबतीत कर्जबाजारीपणा, शेतीतील अपयश, हवामानातील अनिश्चितता आणि शासकीय यंत्रणेकडून पुरेसा आधार न मिळणे ही कारणे आत्महत्येच्या मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये अपयशाची भीती, स्पर्धात्मक वातावरण, पालकांचा दबाव आणि सामाजिक तुलना हे आत्महत्येला प्रवृत्त करणारे घटक ठरतात. तर वृद्धांमध्ये एकाकीपणा, सामाजिक उपेक्षा आणि शारीरिक आजारपण यामुळे जीवननिराशा निर्माण होते.

महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा अशा भागात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गेल्या दोन दशकांत सामाजिक आणि राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पिकाला योग्य भाव न मिळणे, कर्जाचा बोजा, पावसाचे अनिश्चित चक्र, शेतीवरील वाढलेला खर्च, आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचा ताण यामुळे शेतकरी अडचणीत येतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर हे केवळ वैयक्तिक असमर्थतेचे प्रकरण नसून कृषी धोरणातील त्रुटी, आर्थिक विषमता आणि ग्रामीण समाजाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेतील असंतुलन यांचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना देखील तितक्याच वेदनादायी आहेत. शिक्षणातील स्पर्धा, पालकांची अपेक्षा, अपयशाची भीती, करिअरची असुरक्षितता यामुळे तरुण मनांना असह्य ताण सहन करावा लागतो. शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्याचे प्रश्न गांभीर्याने घेतले जात नाहीत, हे एक मोठे कारण आहे. आत्महत्येच्या या घटनांवरून हे लक्षात येते की आपली शिक्षणव्यवस्था केवळ ज्ञानदानापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे. शहरी भागातही आत्महत्येच्या घटना वाढत आहेत. महानगरांतील एकाकी जीवनशैली, सामाजिक नातेसंबंधांचा अभाव, कामाच्या ठिकाणी होणारा ताण, बेरोजगारी, कौटुंबिक विघटन, तणावपूर्ण नातेसंबंध आणि व्यसनाधीनता हे घटक आत्महत्येला कारणीभूत ठरत आहेत. विशेषतः तरुण आणि महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढलेले दिसते. समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास आधुनिकतेसोबत आलेली व्यक्तिवादी जीवनशैली, तुटलेली सामाजिक बंधने, परंपरागत आधारव्यवस्थेचे क्षरण आणि उपभोक्तावादी संस्कृतीमुळे निर्माण झालेली असुरक्षितता ही कारणे ठळकपणे समोर येतात.

स्त्रियांच्या आत्महत्यांचा विचार केला तर चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. घरगुती हिंसा, हुंडा प्रथा, लैंगिक छळ, कौटुंबिक दडपशाही, आर्थिक स्वावलंबनाचा अभाव आणि समाजातील दुय्यम स्थान या कारणांमुळे स्त्रिया आत्महत्येस प्रवृत्त होतात. काही वेळा त्यांचे जीवन नियतीवादी आत्महत्येच्या चौकटीत बसते, कारण त्यांना त्यांच्या आयुष्यावर स्वतःचा ताबा असल्याची जाणीवच नसते. LGBTQ+ समुदायातील आत्महत्या हाही एक प्रश्न आहे. सामाजिक स्वीकाराचा अभाव, तिरस्कार, बहिष्कार आणि भेदभाव यामुळे या गटात सुद्धा आत्महत्येचे होत आहेत. यावरून स्पष्ट होते की आत्महत्या ही समाजातील असमानता, दडपशाही आणि तुटकपणाची अभिव्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने आत्महत्येचे विश्लेषण करताना सामाजिक नियंत्रण, सामाजिक ऐक्य, मूल्यव्यवस्था आणि आधारव्यवस्था या संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. ज्या समाजात व्यक्तींना एकमेकांशी जोडणारे घटक मजबूत असतात, जिथे कुटुंब, समाजसंस्था आणि समुदाय आधार देतात, तिथे आत्महत्येचे प्रमाण कमी दिसते. उलट ज्या ठिकाणी व्यक्ती एकाकीपणात अडकतात, समाजाशी नाते तोडतात, किंवा मूल्यांमध्ये गोंधळ निर्माण होतो, तिथे आत्महत्येच्या घटना वाढतात. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी समाजात आपलेपणा, संवाद, सहकार्य आणि परस्पर जबाबदारीची भावना रुजवणे आवश्यक ठरते.

१० सप्टेंबर रोजी जगभरात पाळल्या जाणाऱ्या 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या' निमित्ताने केवळ वैद्यकीय उपचार किंवा समुपदेशन हाच उपाय नसून, व्यापक सामाजिक उपाययोजना आवश्यक आहेत. मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार, समुपदेशन केंद्रे, हेल्पलाईन्स या उपक्रमांसोबतच शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा, शेती धोरण, महिलांचे सक्षमीकरण, तरुणांच्या संधींची निर्मिती, नातेसंबंधातील संवाद यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषतः ग्रामीण समाजात आत्महत्येची कारणे सामाजिक-आर्थिक स्तरावर जास्त असतात, तर शहरी समाजात एकाकीपणा आणि ताण हे प्रमुख घटक असतात. त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या वास्तवाला समजून घेऊनच प्रतिबंधात्मक धोरण आखणे आवश्यक आहे. आजच्या काळात माध्यमांची भूमिका देखील महत्वाची आहे. आत्महत्येच्या बातम्या कशा पद्धतीने दिल्या जातात यावर समाजाचे मानसशास्त्र परिणाम करते. जर अशा बातम्या सनसनाटी स्वरूपात दिल्या गेल्या, तर त्याचा विपरीत परिणाम होतो. उलट सकारात्मक उदाहरणे, संघर्षावर मात करणाऱ्या कथा, मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारे कार्यक्रम यांचा समाजावर चांगला परिणाम होतो. आत्महत्या ही समस्या केवळ व्यक्तीपुरती मर्यादित न ठेवता ती समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव माध्यमांनी सतत जागृत ठेवली पाहिजे.

आत्महत्या या समस्येवर उपाय शोधताना शासन आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. आत्महत्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर कार्यक्रम राबवणे, शाळा आणि महाविद्यालयांत मानसिक आरोग्य शिक्षणाचा समावेश करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, ग्रामीण भागात शाश्वत शेतीसाठी साहाय्य करणे, समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे अशा अनेक स्तरांवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. आत्महत्येचे मूळ कारण बहुआयामी आहे, त्यामुळे त्यावर उपाययोजना देखील बहुआयामी असायला हव्यात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता आत्महत्या ही एक सामाजिक आजार आहे, आणि तिचा प्रतिबंध हा केवळ वैद्यकीय प्रश्न नाही तर सामाजिक चळवळ आहे. व्यक्तीला एकटे न सोडता, त्याच्या वेदना आणि संघर्ष समजून घेतले, तर आत्महत्या टाळता येऊ शकते. समाजाने आत्महत्येकडे 'समस्या' म्हणून न पाहता, ती 'लक्षण' आहे हे ओळखले पाहिजे. हे लक्षण दुरुस्त करण्यासाठी समाजात समता, न्याय, आपलेपणा आणि सुरक्षिततेचे वातावरण तयार करणे गरजेचे आहे.

१० सप्टेंबर रोजी जगभरात पाळला जाणारा 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रत्येकाचे जीवन मौल्यवान आहे, आणि त्या जीवनाचा सन्मान करण्यासाठी आपण समाज म्हणून सजग राहिले पाहिजे. आत्महत्या हा मार्ग कधीच अंतिम उपाय नसतो. जीवन कितीही कठीण वाटले तरी समाजाच्या सामूहिक आधाराने, संवादाने, सहकार्याने आणि योग्य धोरणात्मक प्रयत्नांनी आपण जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहू शकतो. हा दिवस म्हणजे फक्त स्मरणदिन नसून, आपल्या सामाजिक जबाबदारीची पुनःप्रत्ययकारी आठवण आहे. जर आपण सर्वांनी मिळून आत्महत्येची कारणे ओळखून, ती कमी करण्यासाठी हातभार लावला, तर निश्चितच 'जीवनाचा सन्मान' ही मूल्यव्यवस्था अधिक दृढ होईल. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आत्महत्या रोखणे म्हणजे समाजाला अधिक संवेदनशील, न्याय्य आणि मानवी बनवणे होय.



**– डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या मानसशास्त्र विभागाने पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा.शैलजा लोटके.

## 'आत्महत्या प्रतिबंध दिना'निमित्त न्यू आर्टस् कॉलेजमध्ये व्याख्यान

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या मानसशास्त्र विभागाने १० सप्टेंबर रोजी पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त' 'आत्महत्या प्रतिबंध' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. माउंट लिटेरा झी स्कूलच्या संचालिका प्रा. शैलजा लोटके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

लोटके यांनी विद्यार्थ्यांना आत्महत्या प्रतिबंधाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी आत्महत्येच्या कारणांवर प्रकाश टाकत, समस्येची ओळख कशी करावी, याविषयी माहिती दिली. तसेच, मानसिक आरोग्याच्या समस्या, व्यसन आणि इतर समस्यांवर कशी मात करावी, यासाठी उपयुक्त उपाय सांगितले.

लोटके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना आत्महत्या प्रतिबंधासाठीच्या मदतीसाठी असलेल्या हेल्पलाईन्स आणि राष्ट्रीय वेबसाईटची माहिती दिली. या समस्येचे निराकरण करण्यासाठी दैनंदिन जीवनातले दाखले देत त्यांनी संवाद आणि संवेदना यांचे महत्त्व विशद केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली.

या कार्यक्रमात मानसशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कॉलेजच्या वतीने विभागप्रमुख डॉ.किरण अहिरराव यांनी शैलजा लोटके यांचा सन्मान केला आणि त्यांच्या योगदानाबद्दल प्रा. खिलारी व सानिका कुलांगे यांनी आभार मानले.

## कथाकथन स्पर्धेत हिंदवी शिंदेचे यश



नगर – कै. इचरजबाई फिरोदिया आंतरशालेय कथाकथन स्पर्धेमध्ये हिंदवी शिंदे या विद्यार्थिनीने यश मिळवले आहे. इयत्ता तिसरी चौथी या मोठ्या गटात तिने 'गुरुची शिकवण' ही बोधकथा सादर केली. हिंदवीचे सादरीकरण अतिशय उत्कृष्ट असल्याचे परीक्षकांनी सांगितले, त्यामुळे तिला हा क्रमांक देण्यात येत आहे. शहरस्तरावर घेण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये हिंदवी हिस तृतीय क्रमांक देण्यात आला. हिंदवी ही स्वाभिमानी शिक्षक संघटना जिल्हा अध्यक्ष प्रसाद शिंदे व शिक्षिका भाग्यश्री शिंदे यांची कन्या आहे.

# आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा



आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला.

नगर – भारताचे दुसरे राष्ट्रपती, विचारवंत आणि शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर रोजी जयंतीदिन आय. एम. एस. सी. डी. आर. मध्ये शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय आणि पाश्चात्त्य विचारधारेत दुवा साधला होता. त्यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्याची विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली असता, त्यांनी तो दिवस सर्व शिक्षकांच्या सन्मानार्थ साजरा करावा असे सुचवले होते. याच सूचनेतून भारतात शिक्षक दिनाची परंपरा सुरू झाली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी-२०२०) या दृष्टीकोनाची पुनःप्रत्ययकृती घडवते आणि शिक्षकांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करते.

समारंभाची सुरुवात प्राध्यापक व कर्मचारी यांच्या उपस्थितीत झाली. विद्यार्थ्यांनी गुलाबाच्या फुलांनी पुष्पवृष्टी करून शिक्षक व कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी प्रा. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या वेळी विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, डॉ. महेश पोतदार, अध्यापन व प्रशासकीय कर्मचारी तसेच ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी टंग ट्विस्टर, कोडी, हाउझी, गायन अशा मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या. एम.बी.ए. व एम.सी.ए. दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करून शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एम.बी.ए. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी प्रीती अल्हाट, डॅनियल वाघमारे, अनंत कटला, सुहासिनी लोखंडे, निशा पंडित, साक्षी तेमघरे, अदिती गुजराती, मानसी जोशी, महेश खारमळे, सिद्धी गांधी, दिव्या चौधरी, जान्हवी साळी, जिया अल्फिया खिलजी, वैभवी, साक्षी राचा, मैत्री पूपाल तसेच एम.सी.ए. द्वितीय वर्षाचे विद्यार्थी रिफत बागवान, किरण क्षीरसागर, अनिकेत, सुनील फसले, तेजस टेकें यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचा समारोप फोटोसेशन व अल्पोपहाराने झाला. ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस तसेच ग्रंथालय स्टाफ कु. कृष्णकुमारी थोरे आणि राजेश कांबळे यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले.



युनियन अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

## युनियन अध्यापक विद्यालयात शिक्षक दिन

नगर – येथील युनियन अध्यापक विद्यालयामध्ये ९ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी छात्राध्यापकांना भावी शिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

तसेच अध्यापक विद्यालयातील डी.एल.एल. परीक्षा उत्तीर्ण प्रथम तीन क्रमांकांसाठी प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी त्यांच्या रायझींग ट्रायबल फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्यतर्फे गौरचिन्ह ट्रॉफी देण्यात येईल असे जाहीर केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना 'शिक्षक कसा असावा' याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या बक्षीस वाटपाचा कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन छात्राध्यापिका कु. साक्षी चोथे व भाग्यश्री निळ यांनी सादर केले. या कार्यक्रमास युनियन अध्यापक विद्यालयाचे छात्राध्यापक, मॉडेल प्रॅक्टिसिंग स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक वर्ग, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

# शिक्षकांनी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य देखील सक्षम करावे

### प्राचार्या आशा कवाने यांचे आवाहन; जायंट्स ग्रुपच्या वतीने शिक्षकांचा गौरव

नगर – शिक्षक म्हणजे केवळ ज्ञानदान करणारे व्यक्तिमत्त्व नव्हे, तर समाज घडवणारे खरे मार्गदर्शक असतात, असे प्रतिपादन डॉ. एन. जे. पाऊलबुध्दे एज्युकेशनच्या प्राचार्या आशा कवाने यांनी केले.

जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्यावतीने शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास जायंट्सचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, माजी अध्यक्षा नूतन गुगळे, पूजा पातूरकर, सचिव अमित मुनोत आदी उपस्थित होते.

पुढे प्राचार्या कवाने म्हणाल्या की, शिक्षक म्हणजे अशी व्यक्ती जी फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही, तर सामाजिक व कौटुंबिक समजही देते. विद्यार्थ्यांच्या भाषेनुसार आणि मानसिकतेनुसार विषय समजावून सांगणे ही खरी शिक्षकाची ओळख आहे. आज मानसिक आरोग्य ही गंभीर समस्या असून शिक्षकांनी मुलांना मानसिक आरोग्य आणि समस्यांशी लढण्याची तयारी करून द्यायला हवी, असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी सौ. आशा कवाने, मोतीलाल कोठारी ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक अजितकुमार गुगळे तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोमेश्वर (चांदा) येथील शिक्षक राहुल बोरा यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

संजय गुगळे म्हणाले, शिक्षण केवळ शैक्षणिक गुण आणि नोकरीपुरते मर्यादित न राहता समाज मजबूत करून देशाची प्रगती साधणारे असावे. जायंट्स ग्रुपकडून होत असलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सन्मानित शिक्षकांनी जायंट्स ग्रुपच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक करून, निस्वार्थपणे समाजात कार्य करणाऱ्या संस्थेकडून मिळालेला सन्मान हा अभिमानास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

# गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन म्हणजे पद्मशाली समजाचा दीपस्तंभ

### रविकुमार पंतम यांचे मत; पद्मशाली समाजात आदर्शवत शिक्षकांचा व पदविका पदवीधर विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन शैक्षणिक, सामाजिक मंडळाच्यावतीने आयोजित शिक्षकांचा सत्कार व पदविका पदवीधर विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे दिपप्रज्वलन करताना रविकुमार पंतम आदी.

नगर – शिक्षक हा राष्ट्र निर्माता आहे. मला ही उत्तम शिक्षक मिळाल्याने मी आज आयुष्यात हे यश मिळवू शकलो. आपल्या समाजात अनेक तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांनी उद्योजकतेकडे वळावे, आवश्यक मार्गदर्शन करायला मी आहेच. समाज कार्याचा हा वसा आम्हाला गुरुवर्य बत्तिन यांच्या कडून मिळाला आहे. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन म्हणजे पद्मशाली समजाचा दीपस्तंभ आहेत....!! असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगरचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम म्हणाले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन शैक्षणिक, सामाजिक मंडळाच्या वतीने आयोजित शिक्षकांचा सत्कार व पदविका पदवीधर विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, मंडळाचे अध्यक्ष माजी प्राचार्य बाळकृष्ण सिद्धम, मंडळाचे सचिव माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटिपामुल, कार्याध्यक्ष, ज्ञानेश्वर मंगलारम, प्रा. वीरभद्र बत्तीन, कृष्ण संभार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी केले, तर मंडळाचे सहसचिव कृष्णा संभार यांनी पंतम यांच्या परिचयातून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

डॉ. राधाकृष्णन, साने गुरुजी, ग प्र प्रधान यांच्यासारखेच गुरुवर्य पोट्ट्याना बत्तिन हे ध्येयवादी शिक्षक होते. शिक्षकी पेशा त्यांनी आपल्या अशिक्षित समाजाला सुशिक्षित, सज्ञान करण्यासाठी व्रत म्हणून स्वीकारला. त्यांचा आदर्श घेऊन आम्ही आयुष्यभर काम केले आणि भावी पिढीने ही त्यांच्या आदर्श विचाराचा वारसा जपायला हवा....!! असे माजी प्राचार्य बाळकृष्ण सिद्धम मनोगतात म्हणाले.

यावेळी व्हिएतनाम येथे झालेल्या एशियन पॉवर लिफटिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत एक सुवर्ण व एक ब्राँझ पदकाची कमाई करणाऱ्या देवदत्त प्रवीण गुंडू, नवीन शैक्षणिक धोरणाच्या पंचवार्षिक पूर्ती निमित्त दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय शिक्षा संगम कार्यक्रमात निमंत्रित अतिथी म्हणून सहभागी झाल्या बद्दल राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक नारायण चंद्रकांत मंगलारम, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य पुरस्काराचे मानकरी लक्ष्मीकांत इडलवार यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर सेवेतील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सत्काराची उद्घोषणा मंडळाचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम यांनी केली. उपशिक्षिका सौ. रेखा बुरा यांनी शिक्षक सत्कारास उत्तर दिले. पदविका पदवीधर व पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पारितोषिकाची घोषणा सौ. मीना बत्तिन यांनी केली.

आभार प्रदर्शन मंडळाचे सचिव माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटिपामुल यांनी केले. श्रीनिवास यल्लाराम व साईगीता सब्बन यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनायक बत्तिन, सदाशिव बत्तिन, कुमार आडेप, शेखर दिकोंडा, श्रीनिवास वंगारी, रघुनाथ गाजेंगी, शिवाजी संदुपटला, श्रीनिवास श्रीगादी, दत्तात्रय जोग, हनुमंत जोग, बालकिसन आकूल, मारुती अरकल, सुहास बोडके, अजय न्यालपेल्ली यांनी परिश्रम घेतले.

# कॅलिडोस्कोप




## एका मुलीसाठी धावते रेल्वे!

संपूर्ण जगच नफा-तोट्यावर सुरू आहे; पण जपानमध्ये रेल्वेने असे काही केले आहे, की ते सर्व देशांसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे. जपानमधील होक्काइदो बेटावर क्यू शिराताकी स्टेशन आहे. या स्टेशनची गोष्ट एकदम प्रेरणादायी आहे. २०१६ पर्यंत या स्टेशनवर केवळ एकच विद्यार्थिनी रेल्वेत बसायची. तिचे शिक्षण थांबू नये, यासाठी हे रेल्वे आणि स्टेशन बंद करण्यात आले नाही. कारण त्या विद्यार्थिनीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी रेल्वे हेच एकमेव चांगले साधन होते.

एका वृत्तानुसार, या भागात रहिवाशांकडे कार आणि इतर दळणवळणाची साधने आली होती. काही मध्यमवर्गीयांना मात्र रेल्वेशिवाय पर्याय नव्हता; पण त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी होती. मालवाहक रेल्वेच्याही फ ेऱ्या घटल्या होत्या. त्यामुळे क्यू शिराताकी स्टेशन सुनसान झाले होते; पण या भागातील मुलींना शिक्षणासाठी हाच एकमेव जलद पर्याय असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांना कळाले. मग त्यांनी हे स्टेशन बंद करण्याचा निर्णय पुढे ढकलला. पुढे या स्टेशनवरून एकच मुलगी काना हराडा ही शिक्षणासाठी शहरात जात होती. तिच्यासाठी ही रेल्वे लाईफलाईन ठरली होती. तिच्या एकटीसाठी रेल्वे येथे थांबत होती.

या एका मुलीसाठी हे स्टेशन सुरू होते. येथे एका मुलीसाठीच रेल्वे थांबत होती. या स्टेशनवर कानासाठी दिवसातून दोनदाच रेल्वे थांबत होती. काना शाळेत जाताना आणि ती शाळेतून परत येत होती, तेव्हाच रेल्वे येथे थांबत होती. जर हे रेल्वे स्टेशन बंद केले असते, तर काना हिला ७० मिनिटं चालून दुसऱ्या रेल्वे स्टेशनवरून तिच्या शाळेसाठी रेल्वेचा प्रवास करावा लागला असता, ही बाब अधिकाऱ्यांना माहिती होती. या रेल्वे स्टेशनवरून चार रेल्वे ये-जा करत होत्या. त्यातील दोनच तिच्या नियोजीत वेळेत धावत होत्या.

काना हिला या दोन रेल्वेचाच आधार होता. त्यामुळे तिला इतर कोणत्याही स्पर्धेत अथवा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होता येत नव्हते. शाळा सुटताच तिला धावत स्टेशन गाठावे लागत असे, कारण तिच्यासाठी ही रेल्वे काही सेकंद अधिक थांबत असे. तिच्या शिक्षणासाठी हे स्टेशन सर्वात विश्वासू साधन ठरले होते; मार्च २०१६ मध्ये काना पदवीधर झाली. तिचे शैक्षणिक वर्ष संपले. तेव्हा क्यू-शिराताकी स्टेशन हे कायमचे बंद झाले. त्या वेळी जगभरात जपानच्या रेल्वे प्रशासनाचे आणि क्यू शिराताकी स्टेशनवरील रेल्वे कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या कौतुकाच्या बातम्या प्रसारीत झाल्या.



## गुमनाम है कोई


इजिप्तमध्ये असंख्य ममी आहेत. हजारो वर्षांपासूनच्या या ममी पिरॅमिडमध्ये जपून ठेवण्यात आल्या आहेत. या ममीज म्हणजे जगातलं एक आश्चर्यच म्हणता येईल. ममीवर आधारित बरेच चित्रपट आले. या चित्रपटांमधून बरंच काही भयावह दाखवण्यात आलं. ब्रिटनमध्येही असंच काही तरी घडलं. इथे एका पेटीत ममी ठेवली होती. या पेटीतून चित्रविचित्र आवाज यायला सुरुवात झाली. मग शास्त्रज्ञांनी हा आवाज ध्वनिमुद्रित करायचा निर्णय घेतला. रेकॉर्ड झालेला हा आवाज ऐकून शास्त्रज्ञांनाही धक्काच बसला. ब्रिटनमधल्या लीड्स सीटी म्युझियममध्ये एक ममी ठेवण्यात आली आहे. निसियामून असं या ममीचं नाव आहे. ही ममी तीन हजार वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. इजिप्तचा राजा फॅरो रामसेस ११ च्या दरबारात काम करणाऱ्या एका पुजाऱ्याची ही ममी असल्याचं बोललं जातं. हा पुजारी राजासाठी खबरी म्हणून काम करायचा. तसंच तो त्याला धार्मिक गाणीही ऐकवायचा. या ममीच्या वरून हवा गेल्यानंतर तिच्या तोंडातून विचित्र आवाज येत असे. हे बघून शास्त्रज्ञांची उत्सुकता चाळवली. त्यांनी हा आवाज रेकॉर्ड करायचं ठरवलं. मग त्यांनी ममीच्या गळ्याचं सीटी स्कॅन केलं. मग थ्रीडी प्रटर तंत्रज्ञानाने ममीचं स्वरयंत्र तयार केलं. मग ममीच्या गळ्यातून आवाज काढण्यात आला. त्यावेळी ममीच्या गळ्यातून कण्हण्याचा आवाज आला. ममीवरून हवा गेल्यानंतर येणाऱ्या आवाजाशी हा आवाज तंतोतंत जुळला. ममीच्या जीभेचा काही भाग गायब असल्याचं सीटी स्कॅन दरम्यान लक्षात आलं. गेल्या तीन हजार वर्षांमध्ये ममीची जीभ सडून गेल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या या आवाजाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

## क्रूझवर जायचंय? निर्वस्त्र व्हा, पैसेही मोजा!

हे जग विचित्र लोक आणि रंगांनी भरलेले आहे. 'सोशल मीडिया'वर एका अशा जहाजाची खूप चर्चा आहे, जिथे कपडे घालून नाही, तर कपडे काढून प्रवेश मिळेल. हो, या क्रूझवर लग समानतेला इतके प्राधान्य देण्यात आले आहे, की तुम्हालाही आश्चर्य वाटेल. इतकेच नाही, तर येथे तुम्ही कपडे घालून आलात, तर मोठे भाडे द्यावे लागेल. कपडे काढून टाकल्यानंतरच प्रवेश दिला जाईल. मग तो पुरुष असो वा महिला; न्यूयॉर्क पोस्टच्या एका वृत्तानुसार, ज्यांना कपड्यांशिवाय पार्टी करायला आवडते, ते या क्रूझवर येऊन स्वप्न पूर्ण करू शकतात.

'बेअर नेसेसिटीज' नावाची एक पर्यटन कंपनी आहे. ती लोकांना कपड्यांशिवाय प्रवास करण्याची आणि वेळ मजेत घालवण्याची व्यवस्था करते. या जहाजाचे नाव 'द बिग न्यूड बोट' असे आहे. ती ९६८ फूट लांब आहे. त्यावर लोक पार्टी, लंच आणि डिनरदेखील करू शकतात. येथे जोडप्यांना विशेष प्राधान्य दिले जाते. या क्रूझचे अनेक फोटो 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहेत. त्यात लोक त्यांचा वेळ चांगला घालवताना दिसत आहेत. तथापि, येथे काही नियम आणि कायदे आहेत. गेमग आणि पोहताना कपडे घालू शकता. याशिवाय, दुपारच्या जेवणाच्या वेळी आणि रात्रीच्या जेवणाच्या वेळी प्रायव्हेट पार्ट झाकावे लागतील. या आनंदासाठी ४३ लाख रुपयांपर्यंत खर्च करावा लागेल.

या क्रूझवर जाण्यासाठी तेरा ते पन्नास हजार डॉलर्स



खर्च करावे लागतील. या बोटीवर कंपनी ११ दिवसांसाठी कॅरिबियन समुद्राच्या टूरवर घेऊन जाईल. तिथे संपूर्ण वेळ कपड्यांशिवाय राहावे लागेल.



## बबलमध्ये बसा, वन्यप्राणी पाहा

प्राण्यांना जंगलात मुक्तपणे विहार करताना बघणं कोणाला आवडणार नाही... जंगल सफारीदरम्यान विविध प्राणी न्याहाळता येतात. हे प्राणी आपल्या घरात अगदी निवांत फिरत असतात. हा अनुभव खूप अनोखा असतो. हे प्राणी बघण्यासाठी जीप कवा बसमधून फिरावं लागतं. पण थायलंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पारदर्शी बबलमध्ये बसून वन्य प्राणी न्याहाळता येणार आहेत. इथल्या अनंतरा गोल्डन ट्रँगल एलिफंट कॅम्प अँड रिसॉर्टमध्ये पारदर्शी बबल्स तयार करण्यात आले आहेत. या तंबूरुपी बबल्समध्ये बसून आजूबाजूचे हत्ती बघता येतील. हा जगातला पहिलाच प्रयत्न असल्याचा रिसॉर्टचा दावा आहे. या बबल्समध्ये मोठ्या आकाराचा बेड आणि लिव्हिंग रुम आहे. अर्थात हा जगावेगळा अनुभव घेण्यासाठी एका रात्रीचे ३५ हजार रुपये मोजून दोनजण बबलमध्ये राहू शकतील. हे बबल्स वातानुकुलीत आहेत. अशा बबल्समध्ये बसून वन्य प्राणी बघण्याचा अनुभव भन्नाट असेल यात काहीच शंका नाही.

## महात्मा गांधींची स्तुती केल्याने विद्वानाला अटक

पाकिस्तानातील झेलम येथील रहिवासी इस्लामिक विद्वान अभियंता मोहम्मद अली मिर्झा यांना पाकिस्तान पोलिसांनी अटक केली. त्यांच्यावर अनेक धार्मिक नेत्यांचा आणि इस्लामच्या आदेशांचा प्रचार करणाऱ्या लोकांचा अपमान केल्याचा आरोप आहे. अलिकडेच मोहम्मद अली मिर्झा यांनी महात्मा गांधी यांचे वर्णन मोहंमद अली जिनांहून चांगले नेते म्हणून केले होते. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या गांधीस्तुतीवर अनेक धार्मिक गट संतप्त झाले. या गटांनी सरकारकडून त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली.

मोहम्मद अली मिर्झा यांचे युट्युबवर ३१ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले, की त्यांना सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याच्या कलम ३ अंतर्गत ३० दिवसांसाठी ताब्यात ठेवण्यात आले आणि नंतर तुरुंगात पाठवण्यात आले. धार्मिक संघटनांचा आरोप आहे, की अली मिर्झा यांनी प्रेषित मुहम्मद यांच्याबद्दल वादग्रस्त टिप्पणी केली. त्यामुळे



लोकांच्या भावना दुखावल्या. तथापि, त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे, की त्यांचे शब्द विकृत पद्धतीने सादर केले गेले आहेत. मिर्झा यांनी दुसऱ्या समुदायाची भाषा उद्धृत केल्याचा आरोप होता.

मिर्झा हे व्यवसायाने अभियंता आहेत. 'सोशल मीडिया'वर ते एक धार्मिक नेते आणि विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांचे युट्यूब चॅनेल खूप लोकप्रिय आहे. तिथे ते धर्म आणि समाजाबद्दल त्यांचे स्पष्ट मत देतात. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे ते अनेकदा वादात सापडतात. कट्टर धार्मिक वातावरण असलेल्या पाकिस्तानसारख्या देशात बरेच लोक मिर्झा यांच्या विचारसरणीला आव्हान मानतात. या कारणास्तव, ते सतत कट्टरपंथीयांच्या निशाण्यावर असतात. मिर्झा यांचे समर्थक आणि विरोधक आता समाजमाध्यमांच्या कॉमेंट बॉक्समध्ये भांडू लागले आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, जो पैगंबरांचा अपमान करतो त्याला तुरुंगात जावे लागेल. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, या व्यक्तीची विधाने विकृत करुन प्रस्तुत केली आहेत आणि एक कट रचला गेला आहे; पण अल्ला मिर्झा यांच्यासोबत आहे, तर अन्य एका वापरकर्त्याने लिहिले, मोहम्मद अली मिर्झाने स्पष्टवक्तेपणामुळे अनेक शत्रू बनवले आहेत.

## या देशांकडे नाही लिखित संविधान

भारतात लोकशाही आहे. या देशाच्या नागरिकांना संविधानाने विविध स्वातंत्र्यं बहाल केली आहे. भारताचं संविधान लिखित स्वरुपात आहे. आपल्या देशाचा गाडा संविधानानुसारच हाकला जातो. पण काही देशांमध्ये लिखित संविधान नाही. मग या देशांचा गाडा कशा प्रकारे हाकला जात असावा? जाणून घेऊ.

ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. पण या ब्रिटनकडे स्वत:चं संविधान नाही. वाचून आश्चर्य वाटलं असेल. पण हे खरं आहे. या देशात काही नियम तयार करण्यात आले होते. या नियमांना आधारभूत मानून इथे शासन चालवलं जातं. या नियमांना संविधानाइतकंच महत्त्व आहे. ब्रिटनमधले कायदे वेळ आणि परिस्थितीनुसार बदलता येतात. इथल्या संसदेकडे हे अधिकार आहेत.

सौदी अरेबियामध्येही चित्रविचित्र प्रथा आहेत. इथल्या नियम, कायद्यांविषयी आपण जाणतोच. या देशालाही संविधान नाही. इथला राज्यकारभार कुराणातल्या वचनांनुसार चालतो.



इस्रायलकडेही स्वत:चं संविधान नाही. स्वातंत्र्यानंतर इस्रायलमध्ये संविधान तयार करण्याच्या घडामोडींना वेग आला होता. पण संसदेत होणाऱ्या गदारोळामुळे हे शक्य झालं नाही. इथे अलिखित संविधानाला मान्यता देण्यात आली आहे.

न्यूझीलंडमध्येही लिखित संविधान नाही. इथे अलिखित संविधान आहे. त्यानुसार इथलं शासन चालतं.

## मद्यपानाला इथे आहे परवानगी

आपल्या देशात बजेटला खूप महत्त्व आहे. बजेट सादर करणारा मंत्री हुशार असावा, त्याला अर्थशास्त्राचं ज्ञान असावं अशी आपली अपेक्षा असते. बजेटमुळे काय स्वस्त होणार, काय महागणार, कोणाला काय मिळालं यावर बरीच चर्चा होत असते. निर्मला सीतारामन या भारताच्या अर्थमंत्री आहेत. विविध देशांमध्ये बजेट सादर होतं. पण ब्रिटनमधलं बजेट खऱ्या अर्थाने अनोखं म्हणता येईल. इथे बजेट सादर करणाऱ्या मंत्र्याला चान्सलर म्हटलं जातं. कोणत्याही देशाची संसद म्हणजे लोकशाहीचं पवित्र मंदिर. अशा मंदिरात मद्यपान करून येणं चुकीचं आहे. पण ब्रिटनमध्ये चान्सलर मद्यपान करून बजेट सादर करू शकतो. त्याला तशी परवानगी असते. ब्रिटनची संसद म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमावलीत या बाबीचा समावेश आहे. मद्यपान करून बजेट सादर करण्याचा अधिकार फक्त चान्सलरला असतो. वर्षातला फक्त एकच दिवस चान्सलर मद्यपान करून संसदेत येऊ शकतो. त्यानंतर त्याला अशी परवानगी नसते. हा नियम ब्रिटनमध्ये अनेक दशकांपासून आहे. इथल्या लोकांना हा प्रकार अर्थहीन वाटतो. इतकंच नाही, तर इथे बजेट सादर करण्यासाठी १०० वर्षं एकाच ब्रीफकेसचा वापर करण्यात आला होता. १८६० मध्ये विलियम ग्लॅडस्टोन यांच्यासाठी ही ब्रीफकेस तयार करण्यात आली होती. स्कारलेट असं या ब्रीफकेसचं नाव



होतं. १९६५ पर्यंत याच ब्रीफकेसमध्ये बजेट असायचं. १९६५ मध्ये तत्कालीन चँसेलर जेम्स कॅलेघन यांनी स्वत:साठी नवी ब्रीफकेस तयार करून घेतली आणि स्कारलेटला बाद केलं.

## कबरीतील हाडे आणि कवट्यांची चोरी!

इंग्लंडमधील दफनभूमीतील अनेक कबरी खोदण्यात आल्या आहेत. त्यातील हाडे आणि मानवी कवट्या गायब झाल्याने खळबळ उडाली आहे. यामागे गुन्हेगारांची टोळी असल्याची माहिती समोर येत आहे. ब्रिटनमधील या प्रकारामुळे काहीजण त्यांच्या नातेवाइकांच्या कबरींचे संरक्षण करण्याची मागणी करत आहे.

इंग्लंडमध्ये 'निच शॉप्स' आणि ऑनलाईन रिटेलर्स प्लॅटफॉर्मवर मानवी कवटी आणि हाडांची राजरोस विक्री केली जात आहे. इतकेच नाही, तर या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर किळसवाणा प्रकारही सुरू आहे. आकुंचित झालेल्या मानवी खोपड्या, लहान मुलांच्या कवट्या, मानवी चामड्यांच्या बॅग, वॉलेट, मास्कचीही विक्री येथे होत आहे. सुपरनॅचरल सोसायटीचा भाग असणारे अनेक विचित्र लोक अशा व्यक्तीची मागणी करत आहेत.

इंग्लंडचे प्रसिद्ध न्यायवैद्यक शास्त्रज्ञ डेम सू ब्लॅक यांनी हा ट्रेंड अत्यंत धोकादायक असल्याचे म्हटले आहे. हा ऑनलाईन बाजार 'बॉडी स्नॅचग'ला म्हणजे मृतदेह चोरी करण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याचे ते म्हणाले. या गुन्ह्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. कब्रस्थानात जाऊन अनेक जण कबरी खोदत असल्याने त्यांनी चता व्यक्त केली. चोरट्यांसाठी हे स्वस्तात कमाईचे साधन झाल्याचे ते म्हणाले.

पक्ष्यांच्या घरट्यांची विक्री बेकायदेशीर असेल तर मग



मानवी अवशेषांची विक्री गुन्हा कसा ठरत नाही, असा सवाल त्यांनी केला. एखाद्या मृतदेहाच्या दातांची माळ गळ्यात घालणे समाज कसा स्वीकार करू शकतो, असा सवाल त्यांनी केला. मृत्यूनंतर तरी कुणाच्या शरीराची विटंबना करू नये. त्यांना तसेच शांततेत जगू द्यावे असे ते म्हणाले. तर अशा घटकांची खरेदी-विक्री करणाऱ्यांवर आता थेट कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. अनेकजणांनी कबरींच्या रक्षणासाठी रात्रीची गस्त वाढवावी आणि सुरक्षा रक्षक नेमावेत, सीसीटीव्ही बसवावेत, अशा मागण्या केल्या आहेत.

## चपला घालूनच आत या!

एका मोठ्या ऑफिसच्या बाहेरच्या नेमप्लेटवर 'आयपीएस ऑफिसर' लिहिले असते. आत जाण्यापूर्वी प्रत्येकजण असा विचार करत असतो, की आता त्यांना त्यांचे बूट आणि चप्पल काढावे लागतील; पण नंतर दारावर लटकलेली एक ओळ सर्वांना थांबवते. आयपीएस अधिकाऱ्याने दारावर एक अनोखी चिठ्ठी चिकटवली आहे. पाहुण्यांनी त्यांचे बूट आणि चप्पल काढू नयेत, असा फलक त्यावर आहे!

या आयपीएस अधिकाऱ्याचा हा फलक 'सोशल मीडिया'वर धुमाकूळ घालत आहे. किशन सहाय नावाच्या एका आयपीएस अधिकाऱ्याने त्याच्या ऑफिसच्या बाहेरील भागाचा फोटो क्लिक करून 'सोशल मीडिया'वर पोस्ट केला. येथे, त्याच्या नेमप्लेटच्या अगदी खाली एक कागद चिकटवला आहे त्यावर लिहिले आहे... पाहुण्यांनी बूट/चप्पल काढू नयेत. सोशल मीडियावर हा फोटो शेअर करताना अधिकाऱ्याने लिहिले, 'घराबाहेर येणाऱ्याला बूट काढायला सांगणे अपमानास्पद वाटते, जरी तो अगदी लहानसा अपमान असला तरी. तुमच्या घरी आलेल्या पाहुण्याला




थोडासाही अपमान करणे सामान्य सौजन्याच्या विरुद्ध आहे. हेच मी पाच वर्षांपासून गेटवर लिहिले आहे.

किशन सहाय जयपूरमध्ये पोलिस महासंचालक आहेत. त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर शेअर करण्यात आली आहे. ती आतापर्यंत लाखो लोकांनी पाहिली आहे. अनेकांनी पोस्ट लाईक केली आहे. 'सोशल मीडिया'वरील वापरकर्ते याबद्दल वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका युजरने लिहिले मी तुम्हाला मनापासून सलाम करतो सर. दुसऱ्या युजरने लिहिले, असे अधिकारीच पोलिस खात्याचा आदर वाचवत असतात. दुसऱ्या युजरने लिहिले सगळेच तुमच्यासारखे नसतात सर, मी तुमच्या विचारसरणीला सलाम करतो.

# १७ वर्षा आतील मुलींमध्ये पोदार व मुलांमध्ये १२ वर्ष वयोगटात प्रवरा पब्लिक व १४ वर्ष वयोगटात सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट, श्री साई संघ विजय मिळवून आघाडीवर

**प्रवरा पब्लिक स्कूलचे खेळाडू जयवर्धन मानेदेशमुख याची गोलची डबल हॅट्रीक तर युवराज आहेरची हॅट्रीक**



नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत ९ सप्टेंबर रोजी १७ वर्षा आतील मुलींमध्ये पोदार स्कूल, १२ वर्ष वयोगटात प्रवरा पब्लिक स्कूलने व १४ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट व श्री साई संघाने विजय मिळवला. १६ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्री साई स्कूलचा सामना शेवटच्या क्षणा पर्यंत रंगतदार ठरला. २-२ गोलने हा सामना अनिर्णित राहिला. तर १२ वर्ष वयोगटातील प्रवरा पब्लिक स्कूलचे खेळाडू जयवर्धन मानेदेशमुख याने गोलची डबल हॅट्रीक तर युवराज आहेर ने हॅट्रीक केली.

सकाळच्या सत्रात १७ वर्षा आतील मुलींमध्ये पोदार स्कूल विरुध्द कर्नल परब मध्ये झालेल्या सामन्यात पोदार स्कूलने ६-० गोलने एकतर्फी विजय संपादन केले. प्रतिपर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. यामध्ये जानवी लंघे हिने ४ व काव्या झावरे हिने २ गोल केले.

प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्रीसाई स्कूलमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत सामना रंगला होता. दोन्ही संघांनी बचावात्मक खेळी केली. यामध्ये दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. हा सामना ०-० गोलने अनिर्णित राहिला.

१२ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्रीसाई स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने आक्रमक खेळी करुन विक्रमी १२ गोल करुन एकतर्फी विजय मिळवला. यामध्ये प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूल कडून जयवर्धन मानेदेशमुख याने गोलची डबल हॅट्रीक तर युवराज आहेर याने हॅट्रीक केली. तसेच भीम कुंदन, श्लोक जाधव व श्रेयश डोईफोडे यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट विरुध्द द आयकॉन स्कूलमध्ये सामना रंगला होता. वेदांत देवकर इस्त्राएल आशिष सातराळकर यांनी प्रत्येकी १ गोल करुन २-० गोलने सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट संघाला विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १६ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट विरुध्द द आयकॉन स्कूलमध्ये अटातटीचा सामना रंगला होता. दोन्ही संघातील खेळाडूंनी आक्रमक खेळी केली. शेवट पर्यंत दोन्ही संघाकडून गोल न झाल्याने ०-० गोलने हा सामना अनिर्णित राहिला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) पोदार स्कूल विरुध्द श्री साई स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात अनिरुध्द नागपुरे याने शेवटच्या टप्प्यात १ गोल करुन ०-१ गोलने श्री साई संघाला विजय मिळवून दिला.

१६ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्री साई स्कूलचा सामना शेवटच्या क्षणा पर्यंत रंगतदार ठरला. दोन्ही संघाची आक्रमक व बचावात्मक खेळीने सर्वांचे लक्ष वेधले. प्रवरा पब्लिक स्कूल कडून पवन वाणी व प्रदीप पॉल यांनी प्रत्येकी १ गोल केला. तर श्री साई कडून स्वराज सूर्यवंशी व आदित्य वडेपेल्ली यांनी प्रत्येकी १ गोल केला. दोन्ही संघानी २-२ गोलची बरोबरी साधून हा सामना बरोबरीत सुटला.




सन्मती प्रतिष्ठान संचलित सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांतर्गत श्रीरामपूर एमआयडीसी येथील डिवाइन फार्मा आयुर्वेदिक कंपनीला भेट दिली.

# सिद्धी पॅरामेडिकलच्या विद्यार्थ्यांची डिवाइन फार्मा येथे भेट

नगर – सन्मती प्रतिष्ठान संचलित सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांतर्गत श्रीरामपूर एमआयडीसी येथील डिवाइन फार्मा आयुर्वेदिक कंपनीला भेट दिली. या भेटीदरम्यान आयुर्वेदिक औषधांच्या निर्मिती आणि गुणवत्ता नियंत्रणाबाबत मौल्यवान माहिती घेतली. विद्यार्थ्यांना औषध निर्माण उद्योगातील प्रक्रियांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीत विद्यार्थ्यांनी आयुर्वेदिक औषधनिर्मितीची प्रक्रिया, दर्जा नियंत्रण, तसेच संशोधन व उत्पादन विभागातील कार्यपद्धतीची माहिती घेतली.

कंपनीच्या तज्ज्ञ अधिकारी डॉ. ठुबे आणि समन्वयक गणेश रासकर यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासोबत पारंपरिक आयुर्वेदिक औषधनिर्मितीतील पायऱ्यांचे प्रात्यक्षिक दाखवले. या शैक्षणिक दौर्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळून त्यांचे व्यावहारिक ज्ञान अधिक समृद्ध झाले. भेटी दरम्यान विद्यार्थ्यांचे कुतूहल वाखण्याजोगे होते. विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले तसेच महत्त्वाच्या गोष्टी नोंद करून ठेवल्या. प्राध्यापक महेश जोशी आणि सारिका घोडके यांनी या उपक्रमाचे स्वागत करून भविष्यात अशा शैक्षणिक भेटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

सागर लुंकड यांनी आभार व्यक्त केले.




रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी उपक्रम राबविण्यात आला.

# रोटरी क्लब सेंट्रलतर्फे सीक्यूएव्ही अहिल्यानगर येथे ५००० वृक्षारोपण

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी उपक्रम राबविण्यात आला. १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत सीक्यूएव्ही (सेंट्रल क्वालिटी ॲश्युरन्स-व्हेईकल्स), अहिल्यानगर येथे तब्बल ५००० सीताफळाची रोपे लावण्यात आली.

या प्रकल्पाचे उद्घाटन सीक्यूएव्हीचे प्रमुख ब्रिगेडियर राजीव चावला यांच्या हस्ते झाले. १२५ एकर विस्तीर्ण परिसरात केलेले हे वृक्षारोपण खरोखरच एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

मनोगतात ब्रिगेडियर चावला यांनी वृक्षलागवडीचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. व या उपक्रमामुळे येणाऱ्या काळात सकारात्मक परिणाम होईल असे सांगितले. तसेच त्यांनी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलने करीत असलेल्या कामाचे कौतुक केले.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणी साठी रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटेरियन सुनील कटारिया यांनी परिश्रम घेतले असून क्लब सदस्यांनी त्यांना साथ दिली.

या वेळी सुनील कटारिया, सचिव अमर गुरप, (पीडीजी) पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर शिरीष रायते, सहाय्यक प्रांतपाल ईश्वर बोरा, माजी सहाय्यक प्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले, माजी अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे, जिल्हा टीआरएफ संचालक हरीश नय्यर, जिल्हा चेअरपर्सन मनीष बोरा, राजेश परदेशी, चेतन अमरापूरकर, हितेश गुप्ता, सुजाता कटारिया, मीनल बोरा, सतीश कटारिया, निवृत्ती झिने, सुनील मुथा, संजय मुनोत, वसंत मुनोत, विनोद भंडारी उपस्थित होते.

तसेच सीक्यूएव्हीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

# संगमनेर शहरात ११ सप्टेंबर रोजी ‘पंडित दीनदयाल रोजगार मेळावा’

नगर – संगमनेर तालुक्यात उमेदवारांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर नगरपालिका कला दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब.ना. सारडा विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालय, संगमनेर येथे पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

एचएससी, सर्व शाखांतील पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा व डिग्रीधारक उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://forms.gle/CDMcrNKWzDNpbrL9 या लिंकवर नोंदणी करून पात्रतेनुसार अर्ज करावा.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४१-२९९५७३५ वर संपर्क साधावा. तसेच रोजगार मेळावा समन्वयक वसीमखान पठाण (९४०९५५५४६५), संतोष वाघ (८८३०२१३९७६), बद्रीनाथ आव्हाड (९४२०७२५२८०) आणि योगेश झांजे (९५८८४०८८९०) यांच्याशीही संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी आयडियल स्पोर्टस् ॲकॅडमीच्या २० खेळाडूंची निवड**

जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क येथे झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये आयडियल स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या खेळाडूंनी यश मिळवले. छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ॲकॅडमीच्या २० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक प्रशांत पालवे, तेजस भाबड, आदेश घोडके, कार्तिक गीते यांनी मार्गदर्शन केले.

# युवा साहित्य व नाट्य संमेलनामुळे शहरात चांगले साहित्यिक व सांस्कृतिक वातावरण होईल

**डॉ. प्रशांत भालेराव यांचे प्रतिपादन**

नगर – मसापचे राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलन अहिल्यानगर शहरात होणे हे अभिमानास्पद आहे. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्व स्तरातून संयोजन समिती उत्कृष्ट नियोजन करत आहे. शहरातील सांस्कृतिक, साहित्यिक वातावरण वाढण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त असतात. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असून नगरकरांसाठी ही अनोखी मेजवानी आहे. याचा सर्व नागरिकांनी लाभ घेत या संमेलनाच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव यांनी केले.

अहिल्यानगरच्या मसापच्या सावेडी उपनगर शाखा व न्यू आर्टस् महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ सप्टेंबरला होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या नियोजनाची बैठक न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव यांचा सत्कार करण्यात आला.



राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव यांचा सत्कार करताना न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे.

यावेळी संमेलनाचे निमंत्रक जयंत येलूलकर, सावेडी उपनगर शाखेच्या स्नेहल उपाध्ये, सुरेश चव्हाण, नंदकिशोर आढाव, बाळकृष्ण गोटीपामुल, अश्विनी जठार, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ संजय कळमकर, अनिल आठरे व कल्पना दारकुंडे, मराठी विभागप्रमुख लक्ष्मीकांत येळवंडे, नाट्यशास्त्र विभागप्रमुख बापू चंदनशिवे, मच्छिंद्र मालुंजकर आदींसह प्राध्यापक व मसापच्या शाखेचे सदस्य उपस्थित होते.

प्राचार्य बाळासाहेब सागडे म्हणाले, जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे भाग्य आहे की येथे हे राज्यस्तरीय संमेलन होत आहे. या संमेलनामुळे संस्थेची वेगळी ओळख निर्माण होऊन युवा विद्यार्थ्यांमध्ये मराठी वाचन, लेखन व साहित्या विषयी आवड निर्माण होणार आहे. नवे साहित्यिक निर्माण होण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त आहे.

प्रास्ताविकात निमंत्रक जयंत येलूलकर म्हणाले, सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलांचे उत्कृष्ट नियोजन केले जात आहे. डॉ.प्रशांत भालेराव हे अर्थ व समाजिक क्षेत्रात राज्यात नावाजलेले सुसंस्कृत व्यक्तिमत्व आहे यांच्या नेतृत्वाखाली हे संमेलन यशाच्या शिखरावर जाणार आहे.

प्रा.गणेश भगत यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ संजय कळमकर यांनी आभार मानले. यावेळी राजेंद्र जाधव, गणेश निमसे, भरत होळकर, सुनिता मोटे, दत्तात्रेय नकुलवाड, नितीन दुधाडे, प्रा. डॉ.अशोक गायकवाड आदी प्राध्यापक उपस्थित होते.



अहिल्यानगर येथे मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने पुरोहित सेवा शिबिर झाले.

# अर्चक, पुरोहितांचे धर्म प्रसार व धर्म रक्षणाच्या कार्यात मोठे योगदान

**समीर घरोटे यांचे प्रतिपादन**

नगर – मंदिर ही हिंदू समाजाची शक्ती केंद्र आहे. प्राचीन काळापासून हिंदूधर्म रक्षण व प्रसारासाठी अर्चक, पुरोहितांनी मोठे योगदान दिले आहे. पुरोहित सेवा शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील अर्चक पुरोहितांना श्रमिक कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्याची व्यवस्था मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने करण्यात आली आहे. यामुळे सरकारच्या सर्व योजनांचा लाभ त्यांना मिळेल. व समाजात पुरोहित वर्ग सशक्त होईल, असे प्रतिपादन मंदिर अर्चक पुरोहित आयमाचे प्रांत सहप्रमुख समीर घरोटे यांनी केले आहे.

सारडा महाविद्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने अर्चक, पुरोहितांसाठी आरोग्य शिबिर, श्रमिक कार्ड व आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. याप्रसंगी वेदशास्त्र संपन्न पंढरपूरकर गुरुजी, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, प्रांत सेवा प्रमुख श्याम घरोटे, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत सह प्रमुख समीर घरोटे, मातृशक्ती प्रांत सहप्रमुख श्रीमती शारदाताई रिकामे, इंडो आयरीश हॉस्पिटलचे संचालक डॉ.राकेश जोंधळे, विभाग मंत्री सुनिल खिस्ती, जिल्हा मंत्री अनिल जोशी, सहमंत्री शरदराव नगरकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, प्रांत टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, ॲड.जयदिप देशपांडे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नादापूरकर, डॉ.मिलिंद मोभारकर, हरीभाऊ डोळसे, भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, ललित गांधी, भारत थोरात, राजन निकुंभ, भास्कर टेमकर, गायत्री परीवाराचे काशिनाथ मोडे, तसेच इंडो आयरीश हॉस्पिटल व मेडीकल स्टाफ नगर शहर व जिल्हातील पुरोहीत उपस्थीत होते.

यावेळी पंढरपूरकर गुरुजी म्हणाले, विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पुरोहित वर्गाची आरोग्य तपासणी केली ही कौतुकास्पद बाब आहे. पुरोहित वर्ग पूर्वीपासूनच धर्मा कार्यात योगदान देत आहे. पुरोहित वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने पुढाकार घेतला आहे.

यावेळी शाम घरोटे व ॲड. सतीश गोरडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत नांदापूरकर यांनी केले. जयदीप देशपांडे यांनी आभार मानले.

# खाजगीकरण थांबविण्यासह वीज कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



महाराष्ट्र वीज कामगार महासंघातर्फे वीज कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

नगर – महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, अहिल्यानगर तर्फे विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात जुन्या पेन्शन योजनेची अंमलबजावणी करावी, केंद्र सरकारने खाजगीकरण थांबवावे तसेच वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण क्षेत्रासाठी नवीन त्रिपक्षीय समिती स्थापन करून एकत्रित करावी, अशी मागणी करण्यात आली. यासोबतच महाराष्ट्रातील वीज कामगार, अभियंते व अधिकाऱ्यांसाठी पेन्शन योजना लागू करावी, महावितरण V/R -२०३० दिनांक २६ फेब्रुवारी २०२० रद्द करावी तसेच ३२९ उपकेंद्रे खाजगी कंत्राटदारांना देण्यासाठी जारी केलेल्या निविदा तात्काळ रद्द कराव्यात, अशा मागण्या नोंदवल्या आहेत.

महावितरण कंपनीतील वाढत्या कंत्राटीकरणाला तीव्र विरोध दर्शवून तिन्ही कंपन्यांतील रिक्त पदे भरावीत, वर्ग १ ते ४ पर्यंत भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. वीजक्षेत्रातील विविध प्रश्नांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, यासाठी अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाच्या अधिवेशनात पारित ठरावांनुसार हे निवेदन देण्यात आले.

सदर निवेदन सादर करण्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात हे निवेदन उपचिटणीस तथा नायब तहसीलदार (गृह शाखा) मच्छिंद्र बेरड यांना देण्यात आले.

निवेदन सादरीकरणावेळी भारतीय मजदूर संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय दुधाने, माजी झोन सचिव रविकांत सरोवरे, नाशिक झोन अध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर, सर्कल अध्यक्ष अनिल नजन, सर्कल सचिव गणेश कुंभारे, राहुल वरघंटे, गोरख हरिहर, गणेश वाडेकर, सौ. धरती घबाडे, किरण गायकवाड, सुनील तरटे यांच्यासह झोन, सर्कल व विभागीय पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवाळी सणानिमित्त तात्पुरत्या फटाके विक्री परवान्यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत : जिल्हाधिकारी यांचे आवाहन

नगर – विस्फोटक नियम २००८ मधील तरतुदीनुसार सन २०२५ दिवाळी निमित्त तात्पुरते फटाके परवाने देण्यात येणार आहेत. इच्छुकांनी संबंधित तालुक्याच्या तहसील कार्यालयात २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

अर्ज फॉर्म न. ई-५ मध्ये करणे आवश्यक असून अर्जाचा नमुना संबंधित तालुक्याच्या तहसील कार्यालयात उपलब्ध राहील. विस्फोटक नियम २००८ मधील भाग २ मधील नियम ११३ (ए १३, viii) नुसार अर्ज छाननी फी ३०० रुपये तसेच भाग २ मधील नियम १०० व ११३ (1 V) नुसार परवाना फी ५०० रुपये, अशा प्रकारे एकूण फी ८०० रुपये राहील. परवाना फॉर्म नं. एल.ई-५ साठी dministrative Services Receipt under Explosive ct under Collection, ००७० जड या शीर्षकाखाली संगणक क्र. ००७०००८१०१ स्टेट बँकेत चलनाने भरावे व चलनाची मूळ प्रत अर्जासोबत जोडावी. परवाना फीचे चलन तहसील कार्यालयातून मंजूर करून घेऊन तालुका ठिकाणच्या स्टेट बँकेत भरता येईल.

स्टॉल ग्रामपंचायत हद्दीत असल्यास ग्रामपंचायतीची शिफारस, महानगरपालिका हद्दीत असल्यास महानगरपालिकेची शिफारस, नगरपालिका हद्दीत असल्यास नगरपालिकेची शिफारस, तर छावणी हद्दीत असल्यास कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळांची शिफारस जोडणे आवश्यक आहे. नियोजित जागा वाणिज्य उपयोगासाठी बिनशेती असावी; नसल्यास सक्षम अधिकाऱ्यांची तात्पुरती बिनशेती परवानगी घेऊन सादर करावी. विस्फोटक नियम २००८ मधील नियम ८४, ८५ व ८६ नुसार नमूद केलेल्या बाबींसंदर्भात स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

फटाका स्टॉलकरिता उभारण्यात येणारा तंबू ज्वलनशील पदार्थाचा नसावा. स्टॉल बंदिस्त असावा व बेकायदेशीर व्यक्तींना प्रवेश करता येणार नाही असा असावा. दोन स्टॉलमध्ये किमान तीन मीटर अंतर असावे तसेच ते संरक्षित कार्यस्थळापासून किमान ५० मीटर अंतरावर असावेत. स्टॉल समोरासमोर नसावेत. स्टॉलमध्ये गॅसबत्ती, दिवा किंवा उघडे दिवे वापरू नयेत. विद्युत जोडणी लाकडी बोर्डद्वारे स्टॉलनिहाय असावी. तसेच ती भिंतीवर अथवा छतावर पक्क्या स्वरूपात असावी. प्रत्येक रांगेकरिता स्वतंत्र मास्टर स्विच बसविणे आवश्यक आहे.

फटाका स्टॉलपासून ५० मीटरच्या आत फटाके उडविता येणार नाहीत. एका दुकान समूहामध्ये ५० पेक्षा जास्त दुकाने ठेवू नयेत. शोभेची दारू स्टॉलच्या खिडकीत प्रदर्शनासाठी ठेवू नये. विक्रीसाठी ठेवलेली शोभेची दारू आगप्रतिरोधक वस्तूमध्ये किंवा मूळ बाह्य आवरणासह ठेवावी. ती ज्वलनशील पदार्थ व दुकानातील रहदारीच्या जागेपासून योग्य अंतरावर ठेवणे आवश्यक आहे.

शोभेची दारू मूळ आवरणातून विक्रीसाठी काढल्यानंतर ती तात्काळ स्वच्छ, धुळीरहित जागेत व आगप्रतिरोधक पात्रामध्ये ठेवावी. फटाके साठवण्यासाठी व विक्रीसाठी परवाना असलेले दुकान अशा ज्वलनशील, विस्फोटक अथवा धोकादायक वस्तूंच्या साठवणूक परिसरापासून किमान १५ मीटर अंतरावर असावे. जनहित याचिका क्र. १५३/२०१५ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार फटाके विक्री दुकाने निवासी जागेत किंवा तळघरात असू नयेत. ती भरवस्तीत नसून खुल्या जागेतच असावीत.

वरील सर्व बाबींची पूर्तता करूनच अर्ज सादर करावेत. परवाना तयार झाल्यानंतर तो तहसील कार्यालयातूनच घ्यावा. अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच चुकीने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचेही कळविण्यात आले आहे.

